मंगळवार, १० ऑक्टोबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ६७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 10 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-67 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

## शरद पवार एका सहीने नियुक्त्या करत होते!

### अजित पवार गटाचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा? या मुद्द्यावर सोमवारी दुसऱ्यांदा प्रत्यक्ष सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाने जोरदार युक्तिवाद केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्षांतर्गत निवडणुका घेतल्या जात नव्हत्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे एका सहीने नियुक्त्या करत होते, असा आरोप अजित पवार गटाने केला. शरद पवार घर चालवायचे, तसा पक्ष चालवत होते. त्यांनी नियम पायदडी तुडवले, असा गंभीर आरोप अजित पवार गटाकडून करण्यात आला. यावेळी अजित पवार गटाच्या वकिलांकडून आणखी एक महत्त्वाची विनंती करण्यात आली. निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला 4 वेळा संधी दिली. त्यामुळे त्यांना पुन्हा संधी देऊ नये, अशी विनंती अजित पवार गटाने केली.

अजित पवार गटाचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर शरद पवार गटाच्या वकिलांनी युक्तिवाद केला. यानंतर निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी भूमिका मांडली. मुख्य निवडणूक आयुक्तांनी यावेळी अजित पवार गटाची विनंती फेटाळत शरद पवार यांच्या गटाला मोठा दिलासा दिला. निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या गटाला कागदपत्रे सादर करण्यासाठी 30 ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली. तसेच या प्रकरणी आता अजित पवार गटाचा युक्तिवाद पूर्ण झालाय. पुढच्या सुनावणीवेळी शरद पवार गटाकडून युक्तिवाद केला जाईल. पुढची सुनावणी 9 नोव्हेंबरला होईल, असं निवडणूक आयोगाने स्पष्ट केले.

निवडणूक आयोगातील सुनावणी पार पडल्यानंतर शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी अजित पवार गटावर गंभीर आरोप केला. राष्ट्रवादीच्या प्रकरणावर सुनावणी झालीय. याचिकर्त्यांचा युक्तिवाद संपलाय. तीन व्यक्तींनी त्यांच्याकडून युक्तिवाद केलाय. आम्हाला युक्तिवादासाठी 9 नोव्हेंबरचा वेळ दिला, अशी माहिती अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली.

याचिकाकर्त्यांकडून घाई केली जात होती. त्याबाबत निवडणूक आयोगाने ताशेरे ओढले. आमचा अजून युक्तिवाद सुरु झालेला नाही. आम्हाला 9 हजार प्रतिज्ञापत्र त्रुटी आढळल्या आहेत. या सुनावणीला लवकर संपवण्याचा प्रयत्न केला जातोय. तसेच आमच्या युक्तिवादाला वेळ न देण्याचा याचिकाकर्त्यांचा प्रयत्न होता, पण त्यांचा तो प्रयत्न निवडणूक आयोगाने धुडकवून लावला, अशी प्रतिक्रिया अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली.

निवडणूक आयोगातील पुढची सुनावणी जास्त महत्त्वाची असणार आहे. कारण पुढच्या सुनावणीवेळी शरद पवार यांच्या



वकिलांकडून युक्तिवाद केला जाणार आहे. अजित पवार गटाच्या वकिलांकडून प्रभावीपणे युक्तिवाद करण्यात आलाय. त्यामुळे अजित पवार गटाच्या युक्तिवादाला पुराव्यानिशी खोडून काढणे हे शरद पवार गटाच्या वकिलांसाठी चॅलेंज असणार आहे. शरद पवार गटाचा युक्तिवाद प्रभावी ठरला तर निकाल कदाचित निकाल त्यांच्या बाजूने लागू शकतो. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादाला जास्त महत्त्व आहे.

अजित पवार गटाचे प्रमुख वकील नीरज किशन कौल म्हणाले, अजून सुनावणी सुरू आहे. अजित पवार गटाकडून युक्तिवाद केला जात आहे. माझा युक्तिवाद संपला आहे. आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले की, आमच्या मते पक्षात लोकशाही मूल्यांचे पालन केले नाही. लोकांची नियुक्ती करताना नियमांचे पालन केले नाही. २०२२ मध्ये ज्या काही नियुक्त्या झाल्या, त्या नियमांच्या चौकटीत झाल्या नाहीत. याशिवाय अजित पवार गटाकडे एक लाख प्रतिज्ञापत्रे आहेत. तर त्यांच्या गटाकडे (शरद पवार गट) ४० हजारापेक्षा कमी प्रतिज्ञापत्रे आहेत. त्यामुळे बहुमत आमच्याकडेच आहे, असा युक्तिवाद निवडणूक आयोगासमोर केला असल्याची माहिती वकील नीरज कौल यांनी दिली.




## मराठ्यांचे उपकार फेडण्याची भुजबळांकडे हीच वेळ : जरांगे

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** ना.छगन भुजबळ यांच्याकडे मराठा समाजाने कधीही जात म्हणून बघितलं नाही, मराठ्यांनी त्यांच्या खांद्याला खांदा दिला, त्यांची प्रतिष्ठा वाढवली मात्र आज मराठ्यांवर वेळ आली असता भुजबळ मराठा समाजाला वाऱ्यावर सोडत आहेत. भुजबळ यांना मराठ्यांचे उपकार फेडण्याची वेळ आली आहे मात्र भुजबळ मराठा आरक्षणाला विरोध करत आहेत. त्यांनी मराठा समाजाच्या भावना ओळखत, वेदना समजून घ्यायला हव्यात. सर्वच पक्षांनी मराठा मुलांवर उपकार करून परतफेड करा असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

ते अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ यांच्या मतदार संघातील येवला येथील आयोजित विराट सभेत बोलत होते. छगन भुजबळ यांच्या येवला लासलगाव मतदार संघात मनोज जरांगे यांचे जोरदार स्वागत झाले असून नैताळे, विंचुर, जळगाव नेऊर येथे त्यांचेवर जेसीबीवरून पुष्पवृष्टी करण्यात आली. सगळ्याच पक्षातील ओबीसी नेते विशेषतः ना.छगन भुजबळ हे मी मराठ्यांचा द्वेष करत नाही, मी त्यांच्यासाठी लढा चालू करतो असे म्हणणे सोडून मराठा द्वेष का करत आहेत? असा प्रश्न त्यांनी विचारत मराठ्यांच्या अन्नात माती कालवू नका, मराठा आरक्षणाला ओबीसी समाजाचा विरोध नाही मात्र ओबीसी नेत्यांचा विरोध आहे, त्यामुळे ओबीसी नेत्यांनी मराठा आरक्षणावर राजकारण थांबवावे असे आवाहन त्यांनी केले. कायदा पारित करण्यासाठी पुरावे लागतात त्यासाठी आम्ही ५ हजार पुरावे दिले असून सरकारला दिलेल्या कालावधीत सरकारने आरक्षण द्यावे अन्यथा संघर्षाला सामोरे जावे असाही इशारा त्यांनी दिला. याप्रसंगी माणिकभाऊ शिंदे, मा.आमदार कल्याणराव पाटील, आ.नरेंद्र दराडे, अमृताताई पवार, संजय बनकर, मुंबई कृ.उ.बा.समिती संचालक जयदत्त होळकर, छगन आहेर, ललित दरेकर, शिवा सुरासे आदी नेते उपस्थित होते.

## क्लॉडिया गोल्डिन यांना नोबल पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ागतिक पातळीवर सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या नोबेल पारितोषिकांची घोषणा होण्यास सुरुवात झाली आहे. विविध क्षेत्रातील पुरस्कार जाहीर झाले आहेत. सोमवारी आर्थिक विज्ञान क्षेत्रातील पुरस्कार जाहीर झाला असून अमेरिकेच्या क्लॉडिया गोल्डिन यांना हा पुरस्कार मिळाला आहे. २०२३ मध्ये नोबेल पुरस्कार पटकावणारी क्लॉडिया गोल्डिन या तिसऱ्या महिला ठरल्या आहेत. महिलांच्या श्रम बाजारातील परिणामांबाबत समज वृद्धिंगत केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. क्लॉडिया गोल्डिनच्या महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल धन्यवाद, आम्हाला आता भविष्यात कोणते अडथळे दूर करावे लागतील याबद्दल बरेच काही समजले आहे, असे अर्थशास्त्रातील पुरस्कारासाठी समितीचे अध्यक्ष जेकोब स्वेन्सन म्हणाले. नोकरीच्या ठिकाणी महिला आणि पुरुष यांच्या कमाईत बरीच तफावत असते. शिक्षण आणि व्यवसायावरून कमाईतील हा फरक पूर्वी दाखवून दिला जायचा. परंतु यंदा आर्थिक विज्ञान पुरस्कार विजेत्या गोल्डिन यांनीच दाखवून दिले की, आता एकाच व्यवसायात असलेल्या स्त्री आणि पुरुष यांच्या कमाईतही तफावत आढळते.

प्रवेश देणे चालू आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई मान्यता प्राप्त व संलग्नित
गीताई सेवाभावी शिक्षण संस्था संचलित

समर्थ GNM नर्सिंग स्कूल
शंकुतला ANM नर्सिंग स्कूल
प्रवेश देणे चालू आहे.

| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| GNM | 40 | 3 वर्षे | 12 वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्षे |
| ANM | 20 | 2 वर्षे | 12 वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्षे |

वैशिष्ट्ये
› सुसज्ज इमारत
› तज्ञ प्राध्यापक वृंद
› मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची व्यवस्था
› मागासवर्गीय मुलींसाठी स्कॉलरशीप लागु आहे.(SC,ST)
› नौकरीची 100% गॅरंटी
› प्रक्टिकलसाठी 100 खाटाच्या हॉस्पिटलशी संलग्र

मोफत प्रवेश...!
नांदेड रोड, मुदखेड ता. मुदखेड जि.नांदेड
Mob. 8766028429, 9922036771, 9595614111

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार




किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...

आधुनिक केसरी

माझ्यासाठी वाचन हा दिव्यानंदाची अनुभूती देणारा अनुभव आहे. एखादी छान पौर्णिमेची रात्र असावी आणि खिडकीतून चांदणं आत झिरपत यावं तसा शांत, दिव्य आणि प्रसन्न अनुभव वाचन आपल्याला देतं. या प्रसन्न अनुभवाचं माध्यम असतं एखादं आवडतं पुस्तक, कथा किंवा कविता. डोळ्यांच्या मार्गानं हे चांदणं थेट आतपर्यंत झिरपतं आणि आत्मानंदाचा प्रसन्न अनुभव देतं. एखाद्या पट्टीच्या गायकाला जसा मैफलीत सूर गवसावा आणि मैफल उत्तरोत्तर रंगत जावी तसाच हा अनुभव असतो. या मैफलीत श्रोते जसे सुरांच्या वर्षावाने सचैल न्हाऊन निघतात, तसाच आनंद चांगल्या पुस्तकाचं वाचन आपल्याला देतं. बरं हे वाचन आणि त्याचे प्रकारही वेगवेगळे. मार्ग वेगवेगळे आणि माध्यमही वेगवेगळे. पण परिणाम मात्र एकच असतो आणि तो म्हणजे आनंदाची अनुभूती. जेव्हा मी माझ्यासाठी वाचतो, तेव्हा पुस्तकातील ती अक्षरे अमूर्त रूप धारण करून डोळ्यांच्या खिडकीवाटे थेट मनाच्या गाभाऱ्यात प्रवेश करतात. येताना ती अक्षरे एकेकटी येत नाहीत. ते आपल्यासोबत आनंद, प्रसन्नता कणाकणाने घेऊन आत शिरतात. काळोख्या रात्रीत जसे एखाद्या काचेच्या बरणीत काजवे एकत्र गोळा करावेत आणि ती काचेची बरणी प्रकाशमान व्हावी, तिचा प्रकाश आपल्या चेहऱ्यावर पडावा आणि आपला चेहरा काळोखातही उजळून निघावा तसेच वाचन माझ्या अंतरंग प्रकाशाने भरून टाकते. मनाचा कोपरा न कोपरा उजळून निघतो. उन्हाळ्यात तहानलेल्या धरणीवर जसे पावसाचे थेंब पडावेत आणि थोड्याच वेळात आपल्या शीतलतेने त्यांनी धरित्रीला शांत करावे तसे उत्तम वाङ्मय मनाच्या तहानलेल्या धरणीवर अमृताचे सिंचन करते. मग उन्हाने कोमेजलेले, करपलेले अंकुर टवटवीत होऊन वर येतात आणि ते ' हिरवे हिरवे गार गालिचे ' मनाला प्रसन्नता आणि शांतता देतात. जेव्हा एखादे बुवा, पुराणिक, कथाकार, कीर्तनकार आपल्या रसाळ वाणीद्वारे रामायण, भागवत, हरिविजय, पांडवप्रताप यासारखा एखादा ग्रंथ श्रोत्यांसमोर वाचतात, तेव्हा ते स्वतःबरोबर इतरांनाही आनंदाची अनुभूती देतात. मुळातच हे ग्रंथ भक्तिरसाने ओतप्रोत भरलेले आहेत, त्यात सांगणाऱ्या बुवांची वाणी रसाळ आणि प्रासादिक असेल तर मग विचारायलाच नको. श्रोते त्या वर्षावात चिंब न्हाऊन निघतात. आताही माध्यम तेच असते. म्हणजे बुवांच्या समोर असलेला प्रासादिक ग्रंथ. पण त्या ग्रंथातील अक्षरे आता बुवांच्या हृदयातील ओलावा, आनंद, प्रसन्नता घेऊन ध्वनीचे रूप धारण करतात.





# आनंदी पहाट

## आध्यात्मिकतेचे भान म्हणजेच मानवी भावना

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रार्थना, मंत्र आणि ध्यान यांसारखे आध्यात्मिक आरोग्य लागू करण्याचे अनेक मार्ग आहेत. आध्यात्मिक विकास हा अंशतः एखाद्याचा अंतर्बाह्य गतिमान प्रवास परस्पर प्रक्रिया आहे. या क्रमिक वाढीमध्ये सामान्यतः विकासाच्या तीन टप्प्यांचा समावेश होतो; शुद्धीकरण अवस्था, प्रकाशमय अवस्था आणि एकात्मक अवस्था ह्या होत. आपल्या मानवी विकासाच्या टप्प्यांचे ते प्रतिबिंब दाखवतात जसे, बालपण, किशोरावस्था आणि प्रौढत्व ही होय. आपल्या आध्यात्मिकतेत आपण स्वतः आपल्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवनाचा प्रवास करत असतो. आध्यात्म आपल्याला शांतता, जीवनाचा उद्देश आणि क्षमा या भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणावाच्या वेळी किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे बनते. अर्थाच्या निर्मितीमध्ये आध्यात्मिक मूल्यांमध्ये ऊर्जा, विकास आणि आशा यांचा स्त्रोत निर्माण करणे समाविष्ट आहे. आध्यात्मिक वास्तवाला अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींसाठी अंतिम अर्थ-निर्माता मानले जाऊ शकते. आध्यात्मिक वास्तवाची मानवी भावना सर्व ज्ञात संस्कृतींमध्ये आहे. नैतिक आरोग्य म्हणजे एखाद्या व्यक्तीची योग्य आणि चुकीची जाणीव, नैतिक पद्धतीने वागण्याची त्यांची क्षमता प्रतीत करत असते. व्यक्ती आध्यात्मिक असणे ही बाब व्यक्ती असण्याचे समानार्थी आहे, ज्याचे सर्वोच्च ध्येय स्वतःवर आणि इतरांवर प्रेम करणे आहे. आपण सर्व एक आहोत ही त्याची खात्री, त्याला सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करण्यास आणि कोणत्याही हानिकारक क्रियाकलापांपासून दूर राहण्यास प्रवृत्त करते. जीवनाचा अर्थ जाणून घेणे हे बहुतेकांसाठी आध्यात्म महत्त्वाचे असण्याचे मुख्य कारण आहे. आध्यात्मवाद, काहीतरी पवित्रता शोधण्यासाठी, लोकांना एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करते. एक व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात यावर चिंतन केल्याने सर्वसाधारणपणे मानवी अस्तित्वाचा अर्थ काय याविषयी तुमचे ज्ञान वाढू शकते.



आधुनिक केसरी

**भजनी रंगावे | विठ्ठलाच्या ||**
चालता संगती | व्हावे तुझा दास ||
नको सहवास | अनिकांचा ||१||
लोचना दिसावा | चंद्रभागा तीर ||
श्वास विटेवर | उभा आहे ||२||
देहाच्या पंढरी | टाळांचा गजर ||
आळवावा सूर | अभंगाचा ||३||
माऊलींची ओवी | जनाईचे जाते ||
अनाहत गाते | मुक्ता माझी ||४||
नामाच्या भक्तीत | एकरूप व्हावे ||
भजनी रंगावे | विठ्ठलाच्या ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**प्रगतिं सन्मतिं रम्यां सिद्धिदात्रीं शिवप्रियाम् |**
**धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् ||१०७||** प्रगती, सन्मती, रम्या, सिद्धीदात्री, शिवप्रिया अशा दुर्गा देवीला मी धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**नहिं जीवन नहिं ज्ञान बल, केवल आश्रय सेव । देव सदाफल वन्दहीं, नमो नमो गुरुदेव ।।७६।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०७६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**माझ्यामध्ये ना कुठले आत्मबल आहे, ना ज्ञान बल आहे. एकमात्र आपल्याच भक्तीचा आधार आहे. म्हणून हे सद्गुरु देव ! आपणांस नमस्कार आहे ! नमस्कार आहे !!**

..........

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# उकडीचा मोदक

आधुनिक केसरी




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

गुळखोबरं हे याचं मुख्य मग पंचखाद्य घालुन त्याला पंचतारांकित केले तरी चालते ,शेवटी भक्ति महत्त्वाची आहे.तळणीचे केले तर गव्हाचे पिठ व तेल , आणि तांदळाच्या उकडीचे केले तर तांदळाची पिठी व भरभरून साजुक तुपाची धार ही हवीचं, त्याशिवाय "मोदकायन"पूर्ण होत नाही. उकडीच्या मोदकांचा जागतिक दर्जाचा पदार्थ असं काही दिवसांत ग्लोबल होणार ही माझी भविष्यवाणी आहे. (मला भविष्य सांगता येत नाही, पण बाप्पाच्या आवडत्या खाद्यपदार्था मुळे मी हे म्हणत आहे.) उकडीचे मोदक हा एक कौटुंबिक सोहळा असतो. घरात भरपूर माणसं हवीत,त्याची पुर्वतयारी हवी, आणि तांदळाची उकड जमली की अख्खं घरं आनंदी होतं.सुगरणीची चिकाटी,मनाची एकाग्रता,पाक कलेची कौशल्य अंगी असेल तरचं उकडीचे मोदकाचा घाट घालावा. उगाचंच 'करून टाकला' अशा मानसिकतेच्या लोकांनी तो न केलेला बरा.

# विषयाची व लौकिकाची आस सोडावी

आधुनिक केसरी


आपण रामाचे झालो म्हणजे आपली काळजी त्याला लागते. आपण रामाचे व्हायला अडचण आमचीच. आवडच मुळी आपण विषयाची आणि लौकिकाची ठेवतो. साहजिकच, एकाची आसक्ति ठेवल्याने दुसऱ्याची विरक्ति येते. नोकरीच्या वेळेस आम्ही बायकामुलांना बाजूला सारून कामावर जातो ना ? मग साधनेच्या वेळी बायकोमुले आड येतात हे कारण का सांगावे ? बायको आणि पैका या दोन गोष्टी आमच्या आड येत असतात; असे आजवर अनेक संतांनी सांगितले. मग या निर्माण तरी का केल्या असे कोणी विचारतील. त्याला उत्तर म्हणजे, काड्याच्या पेटीने विस्तवही पेटविता येतो आणि घरही जाळता येते; त्याचा जसा आपण उपयोग करावा तसा तो होतो. खरे म्हणजे आम्हाला भगवंताची तळमळच लागत नाही. एकजण मला म्हणाला की, "मला प्रपंच टाकावासा वाटतो." मी त्याला म्हटले, "नुसता प्रपंच टाकण्याने तुला वैराग्य कसे येईल ? वैराग्याला नेहमी विवेकाची जोड लागते. तू आपला मीपणा टाकलास तरी खूप झाले.



चांगले कर्म आड येत नाही असे थोडेच आहे ? वाईट कर्म कुणाला सांगण्याची तरी आपल्याला लाज वाटते, पण सत्कर्म अभिमानाने ज्याला त्याला सांगत सुटतो. 'मागील जन्मी पाप केले होते म्हणून या जन्मी हे भोगतो' असे म्हणतो; आणि 'आता चांगले कर्मे करतो म्हणजे पुढल्या जन्मी सुख लागेल' असे म्हणतो. म्हणजे जन्ममरण्याच्या फेऱ्यातून सुटण्याऐवजी त्याच्यात गुंडाळले जाण्यासारखेच झाले ! दुष्कर्मामुळे पश्चात्ताप होऊन एकदा तरी भगवंताची आठवण होईल; परंतु सत्कर्माचा अहंकार चांगल्या माणसालाही कुठे नेऊन सोडील याचा पत्ता लागणार नाही.

राजासुद्धा योग्य मार्ग दाखविण्यासाठी आपल्या संगतीला चांगला माणूस ठेवतो. भगवंताने उद्धवालाही 'सत्समागम कर' म्हणून सांगावे, याहून अधिक काय पाहिजे ? कडू कारले खाल्ले तर कडूपणाचीच प्रचीती होते मग विषयाच्या प्राप्तीने जीवन गोड कसे होईल ? 'प्रेम येईल तेव्हा भगवंताची भक्ति करीन' असे म्हणू नये. विषयासाठी आपण मरमर काम करतो आणि तेवढे करूनही सुख लाभत नाही' मग भगवंताचे नाव न घेता, प्रेम येत नाही हे म्हणणे किती वेडेपणाचे आहे ! लग्नाआधी मुलीला दहापाच जणांना दाखविली तरी, लग्न झाल्यावर ज्याप्रमाणे त्यांतला एकच नवरा असतो आणि बाकीच्यांची तिला आठवणही राहात नाही, त्याप्रमाणे, आम्ही एकदा रामाचे झालो, म्हणजे त्याच्याशी लग्न लावले, म्हणजे मग विषयांचे प्रेम कुठे आले ?

# गहिनीनाथ



कां की, आम्हांस एक टोलेजंग जेवणावळ घालावयाची आहे. मग चित्रसेनाने शंभर गंधर्व आणून जिकडे तिकडे पाठविले. ते गंधर्व पुष्कळांस आमंत्रण करून त्यांस घेऊन आले. नवनाथ, शुक्राचार्य, दत्तात्रेय, याज्ञवल्क्य, वसिष्ठ, वामदेव, कपिल, व्यास, पराशर, नारद, वाल्मीकि, आदिकरून मुनिगण तेथे थोडक्याच वेळां येऊन पोहोचले.


नंतर गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथास सांगितले की, भोजनसमारंभास पुष्कळ मंडळी जमली आहे; तरी तुमची मी मागे मार्गांत टाकून दिलेली सोन्याची वीट आणून देतो, ती घेऊन समारंभ साजरा करावा. यावर मच्छिंद्रनाथाने त्याचे समाधान केले कीं, बाळा तुझ्यासारखा शिष्य असल्यावर मला यःकश्चित् सोन्याची वीट घेऊन काय करावयाची आहे ? मग गोरक्ष म्हणाला, सर्व यथासांग होईल; पण हा सर्व आपल्या कृपेचा प्रताप, मजकडे काही नाही, असे बोलून त्याने चरणांवर मस्तक ठेविले व मी सर्व व्यवस्था लावून बंदोबस्त करितो, आपण काही काळजी न करितां स्वस्थ असावे असे सांगितले. नंतर त्याने अष्टसिद्धींस बोलावून त्यांच्याकडे स्वयंपाकाचे काम देऊन

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १० ऑक्टोबर २०२३





नांदेडात मृत्यूकांड घडले काय ? पान ६


नवरात्र-उत्सव सृजनांचा पान ७


# शेलुखडसे येथे पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या भर जहाँगीर जिल्हा परिषद सर्कल मधील शेलुखडसे येथे दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन नुकतेच जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

आपल्या सर्कलच्या सर्वांगीन विकासासाठी सदैव तत्पर असलेले भर जहाँगीर सर्कलचे लोकाभिमुख सदस्य अमित पाटील खडसे यांनी पाठपुरावा करून दलितवस्ती सुधार योजनेतून तब्बल १० लाख रुपयांचा निधी शेलुखडसे ग्राम पंचायतला उपलब्ध करून देण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्याअनुषंगाने सदर कामाचा शुभारंभ अमित पाटील खडसे यांच्या हस्ते करण्यात आला असल्याची माहिती सरपंच सौ. रेणूका भानुदास ताकतोडे आणि उपसरपंच श्री नारायण खडसे यांनी दिली आहे. याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक म्हणून आर्जूनराव खडसे, पंजाबराव खडसे, आर.बी. खडसे, नारायण खडसे, पंजाब खडसे, शालिक खडसे, विनोद खडसे, संदीप शहाणे, विजय शिरसाट तर ग्राम पंचायत सदस्य म्हणून आकाश खडसे, विठ्ठल पारडे, जगदीश खडसे, गोपाल खडसे, जगन खडसे आदींची उपस्थिती होती.



माझ्या संपूर्ण सर्कल मधील प्रत्येक गावातील अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, अपंग व दुर्बल घटकांना शैक्षणिक, सामाजिक, व कौटुंबिक लाभाच्या योजना समाजातील अखेरच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी मी सदैव कटिबध्द आहे. उपरोक्त घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना शासनाच्या सोई, सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी माझा सातत्यपूर्ण प्रयत्न नेहमीच असतो आणि यापुढे देखील कायम राहील. **अमित पाटील खडसे,**
**( जि.प.सदस्य भर जहाँगीर सर्कल )**








# वन्यजीव सप्ताहनिमित्त महाविद्यालयात पारितोषिक वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** आप्पारापेठ प्रादेशिक वनपरिक्षेत्र कार्यालय मार्फत केशव वाबळे, उपवनसंरक्षक नांदेड, गिरी सहाय्यक वनसंरक्षक रोहयो व वन्यजीव नांदेड, उमेश ढगे यांच्या मार्गदर्शना खाली वन्यजीव सप्ताह दिनांक ०७/१०/२०२३रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय आप्पारापेठ आयोजित करण्यात आले. वन्यजीव सप्ताह निमीत्त वने व वन्यजीव, मानव व वन्यजीव संघर्ष, वनसंरक्षण, पर्यावरण संरक्षण, संवर्धनआदी विषयावर वकृत्व स्पर्धा वर्ग ०८वी ते १०च्या विद्यार्थी यांनी भाग घेऊन भाषणे सादर केली आहेत.

स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक आलेल्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले.तसेच सहभाग घेतलेल्या विद्यार्थी यांना पारितोषिके देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास जी.व्ही. मुंडे, श्रीराम व्ही. सज्जन वनपरिमंडळअधिकारी आप्पारापेठ कौड सर, रत्नाळीकर सर वनरक्षक, टी.जी. मुंडे सर दिगांबर खरोडे, भाग्यश्री धोतरे, रघुनाथ वनवे, गीता



डोंगरे, पत्रकार दशरथ आंबेकर ईरगावकर, विलास भालेराव, वनसेवक वानोळे, कुलदीप पाटील,ज्ञानेश्वर माहुरे, शिक्षक वृंद व वनकर्मचारी स्टाफ, मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भुरे यांनी केली. तसेच श्रीराम व्ही. सज्जन वनपरिमंडळ अधिकारी आप्पारापेठ यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना वन व वन्यजीव यांचे संरक्षण व संवर्धन या विषयावर अनमोल असे मार्गदर्शक करुन कार्यक्रमांचा समारोप करण्यात आला आहे.

# तरडगाव येथे श्रीब्रह्मविद्या ज्ञानामृत व्याख्यानमालेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** तरडगाव ता.फलटण येथील महानुभाव आश्रम, श्रीब्रह्मविद्या पाठशाळा येथे "श्रीब्रह्मविद्या ज्ञान चिंतन समिती" द्वारा आयोजित "श्रीब्रह्मविद्या ज्ञानामृत व्याख्यानमाला" या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा कार्यक्रमात रविवार दि.१५ ऑक्टोबर ते मंगळवार दि.२४ ऑक्टोबर या कालावधीत संपन्न होणार असून महानुभाव पंथाच्या साहित्य संपदेतील "स्मृतीस्थळ" या महत्वपूर्ण ग्रंथाच्या आधारे व्याख्यानमालेत व्याख्याते चिंतन मंथन करणार आहेत. महानुभाव आश्रम, श्रीब्रह्मविद्या पाठशाळा तरडगाव या अध्यात्मिक संस्थेचे संचालक महंत श्रीराहेरकरबाबाजी महानुभाव संपूर्ण व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.महानुभाव पंथाचा लीळाचरित्र या आद्य ग्रंथातून सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या तत्वविचारांचे दर्शन घडते.त्याचप्रमाणे स्मृतीस्थळ ग्रंथातून सर्वज्ञांच्या विचारांचे प्रतिबिंब असणाऱ्या आचाराची कृतीशीलता दिसून येते.परमेश्वराच्या वचनांचे पालन करुन ज्ञान, भक्ती, वैराग्याने परिपूर्ण असणारा साधक स्मृतीस्थळातील प्रत्येक पानामध्ये अनुभवता येतो. धर्माच्या संवर्धनासाठी व संरक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.आचार्य श्रीनागदेवाचार्य, पंडीत माहीमभट्ट, आचार्य केशीराजव्यास, महादाईसा अशा अनेक पूर्वज धर्मवीर साधकांनी पंथाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन पंथाची परंपरा जोपासून आचार विचारासह साहित्य निर्मितीची नवक्रांती घडवली.

महानुभाव पंथाची गुरु शिष्य परंपरा, गुरुकुल पद्धती,शास्त्र अभ्यास अशा महत्वपूर्ण बाबी पूर्वजांच्या स्मृतींतून वर्तमानातील पंथासाठी दिशादर्शक ठरत आहे.ब्रह्मविद्या ज्ञानामृत व्याख्यानमालेमध्ये आश्रम संस्थेतील एकुण २३ साधकांची व्याख्याने १० दिवसीय सत्रामध्ये संपन्न होणार आहेत. व्याख्यानमालेच्या निमित्ताने आश्रम संस्थेच्या विविध कार्यामध्ये योगदान देणाऱ्या सेवाभावी व्यक्तीमत्वाचा गुणगौरव व सत्कार संपन्न होणार आहे.व्याख्यानमालेमध्ये पंथातील भाविक भक्त,अभ्यासक, संशोधक,साहित्यिक व प्रतिष्ठित मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

गेल्या १३ वर्षांपासून प्रत्येक वर्षी या व्याख्यानमालेत नवनवीन विषयांवर अभ्यासपूर्ण चिंतन केल्या गेले आहे. यावर्षी व्याख्यानमालेचे १४ वे वर्ष आहे.या वर्षी महानुभाव साहित्य निर्मितीचा स्रोत, आचार्यांची शिकवण अशा विविध विषयांवर प्रबोधनात्मक कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीब्रह्मविद्या पाठशाळा तरडगाव संस्थेच्या वतीने निलेशदादा राहेरकर यांनी केले आहे.कार्यक्रमाच्या आयोजनाची माहिती महानुभाव धर्मप्रसार माध्यमाचे प्रमुख प्रमोददादा राहेरकर यांनी दिली.

# 'अभी नही तो कभी नही' पेन्शनरांचा लढा तीव्र करण्याचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अभी नही तो कभी नही याप्रमाणे जो पर्यंत पेंशनधारकांच्या विविध मागण्या मंजूर होत नाहीत तो पर्यंत हा लढा ठेवून तो आणखी तिव्र करण्याचा निर्धार राष्ट्रीय संघर्ष समितीच्या मासिक बैठकीत घेण्यात आला.

राष्ट्रीय संघर्ष समिती छत्रपती संभाजीनगरची मासिक बैठक धावणी मोहल्ला विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे पार पडली. या बैठकीचे आयोजन महिला फ्रंटच्या सौ. आशाताई शेळके, सौ. कविता भालेराव यांनी केले होते. या बैठकीला शहरातील पेंशन धारक बंधू-भगिनींनी आवर्जून उपस्थिती नोंदविली होती.




या बैठकीत संघटनेचे कार्याध्यक्ष कमलाकर पांगारकर यांनी भोपाळ येथील सीडब्ल्यूसी मिटींगची सविस्तर माहिती दिली. तसेच महिला संघटनेने बुलढाणा येथे चालू असलेल्या श्रमिक आंदोलनात एकदिवसीय उपोषणात सहभाग घेण्याचा निर्णय घेतला. यावेळी राष्ट्रीय संघर्ष समितीचे अध्यक्ष शशिकांतजी वाडगावकर, सौ.कविता भालेराव, सौ. आशाताई शेळके यांनी पेन्शनवाढी संदर्भात मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे प्रसिद्धी प्रमुख नारायण महाराज बांबर्डे यांनी केले. यावेळी संघटनेचे संपर्कप्रमुख अरुण कुलकर्णी, प्रमोद शिंगलकर, विश्वनाथ जांभळे, किसन साळवे, नामदेव पवार, विनायक देशपांडे, कासोटे मामा, निकम तांबोळी, सुराशे साहेब, यांची उपस्थिती होती. यावेळी सर्वानुमते कमांडर साहेबां सोबत खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प केला.

# युद्धाची ठिणगी

आधुनिक केसरी

शनिवारी हमासनं गाझा पट्टीतून इस्रायलच्या भूमीवर शेकडो रॉकेट्स डागली आणि युद्धाला सुरुवात झाली. पॅलेस्टिनी दहशतवाद्यांकडून होणाऱ्या हल्ल्यांना इस्रायलनंही सडेतोड उत्तर देत गाझा पट्टीक हवाई हल्ले सुरू केले. मोठमोठे रॉकेट्स गाझा पट्टीत पडू लागल्यानंतर तिथे रेड सायरन जारी करण्यात आला. आत्तापर्यंत या युद्धात शेकडो नागरिकांचा बळी गेला असून असंख्य इस्रायली स्त्रियांना हमासच्या दहशतवाद्यांनी ओलीस ठेवले आहे. अमेरिका, भारत, कॅनडा यासारख्या जगातील अनेक मोठ्या देशांनी इस्रायलला हवी ती सर्व मदत करण्याची तयारी दर्शवली असली, तरी इस्रायलने मात्र आपल्याला कुणाच्या मदतीची गरज नसल्याचे नमूद केले आहे. इस्रायलचे भारतातील राजदूत नाओर गिलोन यांनी माध्यमांशी बोलताना यासंदर्भात देशाची भूमिका स्पष्ट केली आहे. इतर देशांकडून आपल्याला मदतीसाठी आश्वस्त करण्यात आले असले, तरी इस्रायल आपली लढाई स्वत: करण्यासाठी सक्षम आहे, असे नाओर गिलोन यांनी माध्यमांना सांगितले. अमेरिकेकडून शस्त्रसाहित्याची मदत होत असल्याचे गिलोन यांनी यावेळी स्पष्ट केले. इस्रायलने कधीच कुणाला असे सांगितले नाही की तुम्ही येऊन आमच्यासाठी लढा. आम्ही आमचं युद्ध स्वत: लढतो. इतरांनी आमच्यासाठी लढा द्यावा अशी आमची इच्छा नाही. हे खरे की अमेरिका आम्हाला लष्करी साहित्याच्या बाबतीत मदत करते आहे. पण आम्ही एकत्रच त्याचे उत्पादन आणि संशोधन करत असल्यामुळे ते ही मदत करत आहेत. या युद्धात आम्हाला कुणाच्याही मदतीची आवश्यकता नाही. आम्ही हे युद्ध स्वत: लढू शकतो. हे करण्यासाठी आम्ही पूर्णपणे सक्षम आहोत असे गिलोन यांनी स्पष्ट कले. भारताकडून आम्हाला मदतीसंदर्भात आश्वासन देण्यात आले आहे. पण आम्ही त्यांना मनापासून धन्यवाद दिले. आम्ही त्यांना सांगितले की आम्ही आमचा लढा स्वत: देऊ, असेही गिलोन यावेळी म्हणाले. हमाससारख्या संघटनांना अद्दल घडवण्यासाठी इस्रायलकडे अमर्याद क्षमता आहेत. असे करण्यापासून आम्हाला एकच गोष्ट अडवतेय. पण ती हमास नाही. हमासच्या आसपास असणाऱ्या सामान्य नागरिकांना कोणताही धक्का लागू नये, ही आमची भूमिका आहे. हमास त्यांच्या लोकांची अजिबात काळजी करत नाही. कारण त्यांच्यासाठी हे लोक म्हणजे इस्रायलविरोधातले एक शस्त्रच आहेत, असे नाओर गिलोन यांनी स्पष्ट केले.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# देशाच्या फाळणीला तीव्र विरोधकर्ते!

आधुनिक केसरी

**जयप्रकाश नारायण यांनी कामगार व किसान संघटनेकडे १९४८ ते १९५०च्या दरम्यान विशेष लक्ष दिले. हिंद मजदूर सभा, हिंद किसान पंचायत या संघटना त्यांच्याच प्रयत्नाने स्थापन झाल्या. अखिल भारतीय रेल्वे कामगार संघ, अखिल भारतीय टपाल व तार खाते संघ, अखिल भारतीय संरक्षण कामगार संघ यांचेही ते अध्यक्ष होते. १९५२मध्ये त्यांनी आचार्य कृपलानी यांचा कृषक मजदूर प्रजापक्ष व समाजवादीपक्ष यांचे विलीनीकरण घडवून आणण्यात पुढाकार घेतला. या विलीनीकरणातून अस्तित्वात आलेल्या प्रजा समाजवादी पक्षाचे तेच पहिले सरचिटणीस झाले. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रजा समाजवादी पक्षाचा पराभव झाला. त्याच सुमारास टपाल व तारखात्यातील कामगार संपाच्या बाबतीत संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी दिलेल्या तोंडी आश्वासनांवर भिस्त ठेवून त्यांनी संप मागे घेतला.**

आश्वासन मात्र पुरे करण्यात न आल्यामुळे अस्वस्थ होऊन जयप्रकाशांनी पुण्यात आत्मशुद्धीसाठी तीन आठवड्यांचे उपोषण केले. या वेळी केलेल्या विचारमंथनातून त्यांची नवी वैचारिक भूमिका तयार झाली. तत्त्वप्रणाली म्हणून त्यांनी जाहीररीत्या मार्क्सवादाचा त्याग केला. मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादात माणसाने सदाचारी का असावे, याला उत्तर मिळत नाही, असे मत झाले. भौतिक गरजांची परिसीमा आणि समाजवाद, पक्षीय राजनीती, सत्तेचे विकेंद्रीकरण, मानव समाजामध्ये राज्यसत्तेचे स्थान, जनतेचा समाजवाद विरुद्ध शासकीय समाजवाद, भावी समाजवादाचे रूप इ. प्रश्नांबाबत त्यांनी बराच ऊहापोह केला. १९५३ मध्ये नेहरूंनी जयप्रकाशांना वाटाघाटीस बोलाविले; त्यांनी आपला पक्ष बरखास्त न करता मंत्रिमंडळात येऊन सहकार्य करावे, अशी नेहरूंची सूचना होती; परंतु किमान कार्यक्रमावर एकमत झाल्याशिवाय अशा प्रकारचे सहकार्य अशक्य आहे, अशी जयप्रकाश यांनी भूमिका घेतली. ती नेहरूंना मान्य न झाल्यामुळे वाटाघाटी अयशस्वी झाल्या. त्या वर्षी रंगून येथे झालेल्या आशियाई समाजवादी परिषदेत भारतीय प्रतिनिधिमंडळाचे त्यांनी नेतृत्व केले. आशियाई क्रांती ही किसान क्रांती असली पाहिजे व ही लोकक्रांती अहिंसक मार्गाने करणे इष्ट आहे, असे विचार त्यांनी परिषदेपुढे मांडले होते. लोकनायक जयप्रकाश नारायण हे भारतातील एक समाजवादी राजकीय धुरीण व सर्वोदय कार्यकर्ते होते. बिहारच्या सारन जिल्ह्यातील सिताबदियार येथे त्यांचा दि.११ ऑक्टोबर १९०२ रोजी जन्म झाला. तेथेच प्राथमिक व पुढे पाटणा येथे माध्यमिक शालेय शिक्षण पूर्ण केले. वयाच्या अठराव्या वर्षी प्रभावतीदेवी यांच्याशी त्यांचा विवाह झाला. सासरे ब्रजकिशोर हे बिहारमधील एक राष्ट्रीय नेते व प्रसिद्ध वकील होते. त्यांनीच चंपारण्यातील अन्यायाची दाद लावून घेण्यासाठी गांधीजींना बिहारमध्ये येण्यास पाचारण केले. प्रभावतीदेवींमुळे गांधीजींशी प्रथमपासून त्यांचा निकट संबंध जोडला गेला. इंटरमध्ये असताना त्यांनी असहकाराच्या चळवळीत भाग घेतला. १९२२मध्ये ते अमेरिकेस गेले. विस्कॉन्सिन विद्यापीठाची समाजशास्त्रातील एम्‌ए पदवी त्यांनी घेतली. १९२९मध्ये ते भारतात परत आले. अमेरिकेतच जयप्रकाशांचा मार्क्सवादी विचारांशी परिचय झाला. मानवेंद्रनाथ रॉय यांचा आफ्टरमाथ ऑफ दी नॉन को-ऑपरेशन हा निबंध व मार्क्स, लेनिन, ट्रॉट्स्की यांचे साहित्य वाचून ते कट्टर मार्क्सवादी बनले. गांधींची विचारप्रणाली व कार्यपद्धती यासंबंधी काही काळ ते असमाधानी होते. तथापि काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीसंबंधीच्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या भूमिकेशीही ते सहमत नव्हते. मार्क्सवाद्यांनी मध्यमवर्गीयांशी सहकार्य करावे, त्यांनी चालविलेल्या वसाहतींमधील राष्ट्रीय चळवळीतून अंग काढून एकाकी पडू नये, या लेनिनच्याच मताचे ते होते. म्हणून भारतात परत आल्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९३०मध्ये जवाहरलाल नेहरू काँग्रेसचे अध्यक्ष असताना त्यांनी जयप्रकाशांना काँग्रेसच्या कामगार विभागाचे प्रमुख नेमले. गांधीजी गोलमेज परिषदेहून परत आल्यानंतर झालेल्या सत्याग्रह-चळचळीच्या दुसऱ्या पर्वात सर्व पुढारी तुरुंगात असताना त्यांनी चळचळीची सूत्रे सांभाळली. १९३३मध्ये मद्रास येथे त्यांना अटक होऊन एक वर्षाची शिक्षा झाली. अन्य समाजवादी तरुणांच्या साहाय्याने आणि सहकार्याने त्यांनी १९३४मध्ये काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना केली. त्यांनाच या पक्षाचे सरचिटणीस म्हणून नेमले गेले. आपल्या भूमिकेची सांगोपांग चर्चा त्यांनी व्हाय सोशॅलिझम या पुस्तकात केली आहे. भारतीय कम्युनिस्टांनी काँग्रेसला राष्ट्रीय आघाडी म्हणून मान्य केल्यामुळे त्यांना समाजवादी कम्युनिस्ट संयुक्त दलाची शक्यता वाटू लागली; म्हणून प्रमुख सहकाऱ्यांचा विरोध असतानाही भारतीय कम्युनिस्ट पक्षाबरोबर त्यांनी समझोता केला. परंतु ही एकता फार काळ टिकली नाही. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले, तेव्हा त्यांनी युद्धविरोधाचे व स्वातंत्र्यलढा उग्र करण्याचे धोरण अवलंबिले. त्यामुळे त्यांना अटक होऊन नऊ महिन्यांची शिक्षा झाली. १९४१मध्ये पुन्हा त्यांना अटक करून राजस्थानमधील देवळी तुरुंगात ठेवण्यात आले. तेथे राजबंद्यांवरील अन्यायाविरुद्ध महिनाभर उपोषण करून सरकारला आपल्या मागण्या मान्य करण्यास त्यांनी भाग पाडले.



जयप्रकाशांच्या प्रयत्नाने १९६४मध्ये भारत सरकार व नागा बंडखोर पुढारी यांत युद्धविराम तहावर सह्या झाल्या. १९६५मध्ये त्यांना शांतता कार्याबद्दल रेमन मागसाय हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला. १९७०मध्ये त्यांनी बिहारच्या मुझफरपूर जिल्ह्यात दौरा काढून तेथील नक्षलवाद्यांचे हृदयपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. १९७१मध्ये त्यांनी बांगला देशातील परिस्थिती जगापुढे मांडण्यासाठी जागतिक दौरा केला आणि त्यावर्षी सप्टेंबर महिन्यात नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय परिषद भरविली; मे १९७२ मध्ये मध्यप्रदेशातील २६७ अट्टल दरोडेखोरांनी जयप्रकाशांच्या विनंतीवरून भारत सरकार व मध्य प्रदेश सरकार यांच्यापुढे शरणागती पत्करली होती. त्यांनी संशोधन कार्य करणाऱ्या संस्थाही या काळात स्थापन केल्या. असोशिएशन ऑफ व्हॉलंटरी एजन्सीज फॉर रूरल डेव्हलपमेंट, गांधीयन इन्स्टिट्यूट ऑफ स्टडीज आणि अखिल भारतीय पंचायत परिषद या संस्थांचे ते अध्यक्ष किंवा मानसेवी संचालक होते. तसेच काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम या वैचारिक व सांस्कृतिक स्वातंत्र्यास वाहिलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थेचे ते एक संस्थापक व अनेक वर्षे मानसेवी अध्यक्ष होते. इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम या संस्थेचे सुरुवातीपासून ते सदस्य राहिले आहेत.

१९४२च्या सुरुवातीस त्यांना बिहारमधील हजारीबाग तुरुंगात हलविण्यात आले. यावेळी बाहेर छोडो भारत आंदोलन सुरू झाले होते. त्यात भाग घेण्यासाठी अत्यंत साहसपूर्ण रीतीने तुरुंगाच्या भिंतींवरून उडी मारून ते फरारी झाले व भूमिगत संघटनेचे नेतृत्व करू लागले. त्यांनी गनिमी तंत्राने लढणारे आझाद दस्ते संघटित केले. त्यांच्या नेपाळमधील हालचालींचा सुगावा लागल्याने त्यांना नेपाळी पोलीस ब्रिटिश हद्दीत नेत होते. तेव्हा आझाद दस्त्याच्या सैनिकांनी अचानक हल्ला करून नेपाळी पोलीसांच्या हातून त्यांची सुटका केली. यानंतर ते भारतात परत येऊन भूमिगत राहून कार्य करू लागले. त्यावेळी सरकारने त्यांना पकडून देणाऱ्यास दहा हजार रुपयांचे इनाम जाहीर केले. १७ सप्टेंबर १९४३ रोजी अमृतसर रेल्वे स्थानकावर त्यांना पकडण्यात आले व तेथून १९४६ साली त्यांची सुटका झाली. त्यानंतर त्यांनी टूर्वड्झ स्ट्रगल हे पुस्तक प्रसिद्ध करून राष्ट्रीय चळवळीची कारणमीमांसा केली.

ब्रिटिश सरकारने सुरू केलेल्या वाटाघाटींना, ब्रिटिश सरकारने नेमलेल्या संविधान परिषदेला तसेच देशाच्या फाळणीला जयप्रकाशांचा विरोध होता. अखेर म.गांधींच्या हत्येनंतर काँग्रेसमध्ये राहून समाजवादी समाजरचनेचे ध्येय साध्य होणार नाही; म्हणून त्यांनी १९४८मध्ये अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने स्वतंत्र समाजवादी पक्षाची स्थापना करून काँग्रेसला पर्यायी पक्ष निर्माण केला. पक्षाने नैतिक मूल्यांना सर्वोच्च स्थान द्यावे, साधनशुचितेचे महत्त्व मानावे, सत्ता धारण करणाऱ्यापेक्षा सेवा करणाऱ्यांची प्रतिष्ठा अधिक मानावी, असे आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी आवाहन केले. त्यांची भूमिका लोकशाही समाजवाद्यांची झाली होती. हिंसेपेक्षा गांधीप्रणीत सत्याग्रहतंत्राचा समाजवाद्यांनी अवलंब करावा, ही त्यांची विचारसरणी पक्षाने स्वीकारली. पक्षाचे पहिले सरचिटणीस म्हणून त्यांचीच निवड झाली. त्यांनी १९५३ नंतर विनोबाजींच्या भूदान आंदोलनात भाग घेण्यास सुरुवात केली. १९ एप्रिल १९५४मध्ये बोधगया येथील सर्वोदय संमेलनात भूदान कार्यासाठी पक्षीय राजकारणातून त्यांनी संपूर्णतः अंग काढून घेतले. त्यांनी अ प्ली फॉर दी रिकंस्ट्रक्शन ऑफ इंडियन पॉलिटी व फ्रॉम सोशॅलिझम टू सर्वोदय ही पुस्तके लिहिली. १९६१च्या सर्वोदय संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून भाषण करताना आपल्या राजकारण-संन्यासाच्या मर्यादाही त्यांनी स्पष्ट केल्या होत्या; पक्षीय राजकारणाचा त्याग म्हणजे देशातील घडामोडींसंबंधी उदासीन राहणे नव्हे; उलट राष्ट्रीय जीवनात अधिक परिणामकारक व अधिक रचनात्मक भाग घेण्यासाठी पक्षीय व सत्तात्मक राजकारणातून आपण दूर झालो आहोत, असे स्पष्टीकरण त्यांनी केले.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# इस्रायल इतका आक्रमक का आहे ?

आधुनिक केसरी

**इस्रायल आणि हमास या दहशतवादी संघटना यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा वाढला आहे. शनिवारी सकाळी सर्वप्रथम हमासने गाझा पट्टीतून इस्रायलवर प्रचंड रॉकेट हल्ले केले. हमासच्या दहशतवाद्यांनी अवघ्या 20 मिनिटांत इस्रायलवर 5000 क्षेपणास्त्रे डागली. इस्त्रायली शहरांना लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यांमध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला. यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू सक्रिय मोडमध्ये आले. याचा फटका हमासच्या लढवय्यांना सहन करावा लागेल, असे ते म्हणाले. नेतन्याहू यांनी याला युद्ध गुन्हा म्हटले आहे. इस्रायलच्या प्रत्युत्तरादाखल आतापर्यंत 200 हून अधिक पॅलेस्टिनी ठार झाले आहेत. इस्रायल आणि पॅलेस्टाईन आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही दोघांमध्ये अनेकदा वाद झाले होते. या संघर्षात शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे. आकडेवारीनुसार, इस्रायल आणि हमास जेव्हा-जेव्हा आमनेसामने आले आहेत, तेव्हा पॅलेस्टाईनचा पराभव झाला आहे. फक्त तोटाच नाही तर भयंकर नुकसान.**

इस्रायल आणि पॅलेस्टाईन आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ नाही. दोन्ही देशांमधला वर्षानुवर्षे जुना वाद आहे, जो संपत नाही. गाझा पट्टीबाबत इस्रायल इतका आक्रमक का आहे आणि या दोघांमधील वादाचे खरे कारण काय आहे ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न.. मीडिया रिपोर्ट्सनुसार, शनिवारी सकाळी गाझा पट्टीतून इस्रायलवर 30 मिनिटे सतत रॉकेट हल्ले होत होते, त्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने युद्ध घोषित केले. आता दोन्ही देशांमधील संघर्ष पुन्हा तीव्र झाला आहे. एप्रिल २०२३ मध्ये इस्रायलने गाझा पट्टीवर हवाई हल्ला केला. यामध्ये हमास इत्यादींच्या शस्त्रास्त्र निर्मिती केंद्रांना लक्ष्य करण्यात आले. प्रत्युत्तर म्हणून पॅलेस्टाईनकडूनही क्षेपणास्त्रे डागण्यात आली. गाझा पट्टीबाबत इस्रायल आक्रमक का आहे? गाझा पट्टी हा पॅलेस्टाईनचा एक छोटा भाग आहे. येथे 'हमास'चे नियम आहेत. गाझा पट्टी इजिप्त आणि इस्रायल यांच्यामध्ये भूमध्य सागरी किनारपट्टीवर स्थित आहे. पॅलेस्टाईन हा अरब आणि बहुसंख्य मुस्लिम बहुल प्रदेश आहे. 21 लाख लोकसंख्या असलेला गाझा पट्टी हा जगातील सर्वात दाट लोकवस्तीचा भाग मानला जातो. हे 5 प्रशासकीय क्षेत्रांमध्ये विभागलेले आहे. ज्यामध्ये उत्तर गाझा, गाझा सिटी, देर अल-बालाह, खान युनिस आणि रफाह यांचा समावेश आहे. हमास गाझा पट्टीतूनच इस्रायलवर हल्ले करतो. इस्रायल 'हमास'ला दहशतवादी संघटना मानतो. या कारणास्तव इस्रायल गाझा आणि हमासवर नेहमीच आक्रमक असतो. **दोन देशांमध्ये वाद का?** 19व्या शतकात इस्रायलची संपूर्ण भूमी पॅलेस्टाईन म्हणून ओळखली जात होती. युरोपात विखुरलेले ज्यू पॅलेस्टाईनच्या दिशेने स्थलांतर करू लागले. हळूहळू त्यांची संख्या पॅलेस्टाईनमध्ये वाढली आणि ज्यूंनी पॅलेस्टाईनमध्ये जमीन खरेदी करण्यास सुरुवात केली. पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे वर्चस्व वाढते आणि ते पॅलेस्टिनींना तिथून हाकलून देऊ लागले. दुसऱ्या महायुद्धात हिटलरने 42 लाख ज्यूंना गॅस चेंबरमध्ये टाकून मारले होते. त्यानंतर ज्यू पॅलेस्टाईनमधून पळून जाऊ लागले. **हे प्रकरण संयुक्त राष्ट्रात गेले**. त्यानंतर ज्यू आणि पॅलेस्टिनींचा प्रश्न नव्याने स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रांकडे गेला. संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवले की ज्या भागात ज्यूंची संख्या जास्त आहे तो भाग इस्रायलला द्यायचा आणि उर्वरित अरब बहुसंख्य भाग पॅलेस्टाईनला द्यायचा. तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये वाद सुरूच आहे. 2008-09, 2012, 2014, 2021 आणि 2022 मध्येही दोन्ही देशांमध्ये युद्ध झाले होते.युनायटेड नेशन्सच्या म्हणण्यानुसार, गेल्या 13 वर्षांत दोन्ही देशांमधील युद्धात एकूण 1,25,873 लोक मारले/जखमी झाले आहेत. 1,25,873 मृत/जखमींपैकी 5,887 मृत/जखमी इस्रायली नागरिक आहेत, तर 1,19,986 मृत/जखमी पॅलेस्टिनी नागरिक आहेत.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# धाराशिव जिल्हा हद्दीतील महामार्गावर मृत्युंजय दूतांची नेमणूक

## महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव अंतर्गत रस्त्यावर मोटरसायकलवरून पडून अपघात होण्याचे प्रमाण जास्त

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्हा महामार्ग पोलीस केंद्र अंतर्गत एकुण तीन राष्ट्रीय महामार्ग आहेत. त्या महामार्गांची एकुण लांबी ही १४६ कि.मी. आहे आणि त्यासोबतच जिल्ह्या हद्दीत दहा राज्य महामार्ग असून त्याची एकुण लांबी ४३६ कि.मी.आहे.

सदर महामार्गावर अपघात घडल्यानंतर जखमींना तात्काळ मदत मिळावी यासाठी पोलीस महाराष्ट्र राज्य महासंचालक यांच्या संकल्पनेतून मृत्युंजय दुत ही संकल्पना संपुर्ण राज्यभरात राबविण्यात आलेली आहे.यात महामार्ग पोलीस केंद्र,धाराशिव अंतर्गत विविध महामार्गावर एकुण ८६ मृत्युंजय दुत म्हणून काम करत आहेत.

महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव हददीमध्ये राष्ट्रीय व राज्य महामार्गावर सन २०२२ मध्ये एकुण ११७ प्राणांकित अपघातामध्ये १२७ व्यक्तींचा मृत्यु झालेला आहे. त्यामध्ये २५ व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या आहेत. तसेच ७२ गंभीर अपघातामध्ये १२२ व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या आहेत. २४ सप्टेंबर २०२३ रोजी पर्यंत च्या अहवालानुसार एकुण ६२ प्राणांकित अपघातामध्ये ६७ व्यक्तींचा मृत्यु झाला त्यामध्ये २१ व्यक्ती ह्या गंभीर जखमी झालेल्या आहेत. 24 सप्टेंबर पर्यंत झालेल्या एकुण ६० गंभीर अपघातामध्ये १०१ व्यक्ती ह्या गंभीर जखमी आहेत. त्या अपघाता पैकी महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव यांनी ६१ अपघातामध्ये गोल्डन आवर्समध्ये मदत करुन जखमींचा जिव वाचविला आहे. किरकोळ व गंभीर अपघाताचा विचार केला असता मृत्युमुखी पडण्यामध्ये पुरुषाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव हददीमध्ये अतिवेगाने वाहन चालविणे, विना हेल्मेट वाहन चालविणे, रॉंग साईडने वाहन चालविणे, वाहतुक चिन्हाचे पालन न करणे इत्यादी गोष्टीमुळे अपघात होण्याचे प्रमाण कायम जास्त आहे.अपघात मृत्यु होण्यामध्ये मोटार सायकल चालकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सदर अपघात हे रात्रीच्या वेळेस जास्त प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर आळणी चौक, सोनेगाव चौक येडशी, वडगाव पाटी येथे वारंवार अपघात होतात.



गेल्या वर्षीच्या तुलनेत चालू वर्षामध्ये अपघाताचे प्रमाण काही अंशी कमी झाले असून त्यामध्ये महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव यांच्याकडून शाळा, कॉलेज, रस्तावरुन प्रवास करणारे प्रवाशी, वाहन चालक यांना वाहतुकीचे नियमा बाबत केलेले जनजागृती प्रबोधन, अपघात घडल्यानंतर जखमींना वेळेत मदत मिळत आहे .रस्ते विकास करणाऱ्या संस्थेला पत्रव्यवहार करुन रोडवरील लाईट खड्डे याबाबत वारंवार सूचना करण्यात आलेले आहेत असे महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव यांच्याकडून सांगण्यात आले आहे .वाहनधारकाने वाहतुकीचे नियम पाळावेत, मोटरसायकलस्वरांनी हेल्मेट वापरावे_
**निशिकांत शिंदे, सहा . पोलीस निरीक्षक, महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव**

तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ सी वर कन्हेरवाडी शिवारात वारंवार अपघात होतात.

महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव कार्यालया मार्फत राष्ट्रीय व राज्य मार्गाची देखभाल करणारे संस्था भारतीय राष्ट्रीय राज मार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी विभागास पत्र देवून वेग मर्यादा फलक, वाहतुक चिन्ह फलक, रोडवरील पडलेले खड्डे बुजवणे बाबत पत्रव्यवहार करून कामे पुर्ण करून घेतली आहेत.

धाराशिव रस्ते वाहतूक मार्ग हददीमध्ये ०८ साखर कारखाने आहेत. त्यामूळे ऊस वाहतुक करणाऱ्या वाहनांची संख्याही जास्त असल्याने, ऊस वाहतूक वाहनांकडून रात्रीच्या वेळी वाहन रस्त्यात उभ्या करणे,वाहणास रिफलेक्टर नसणे यामुळे अपघात होण्याचे प्रमाण जास्त आहे.सदर अपघात कमी व्हावेत यासाठी हद्दीतील सर्व साखर कारखान्यांना यांना पत्र देवून ऊस वाहतुक करणाऱ्या वाहनांना रिफलेक्टर बसवून घेणे, वाहतुक नियमाचे पालन करण्या बाबत महामार्ग केंद्राकडून पत्राद्वारे कळविले आहे. सदर साखर कारखान्यावर जावून ऊस वाहतुक करणारे चालक यांना वाहतुक नियमाबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करून रिफलेक्टर लावण्यात आले आहेत.

महामार्ग पोलीस केंद्र, धाराशिव कार्यालया मार्फत सन २०२२ मध्ये वाहतुक नियमाचे भंग करणारे वाहन चालक यांच्या विरुध्द १४, ६, ९५ चालन करुन 9.92 * 0.89 * 0.8 / - रुपये दंड आकारण्या आला. त्यापैकी चारचाकी वाहनावर १३, २८४ केसेस करुन 9. E * 8.9C ,900/ रुपये दंड आकारण्यात आला तसेच मोटार सायकल चालक यांच्या विरुध्द १४११ केसेस मध्ये ७४, २७००/- इतर दंड आकारण्यात आला आहे. एकुण केसेस मधील आकारण्यात आलेल्या दंडा पैकी ५०, २४, ३०० /- रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच २५ सप्टेंबर २०२३ पर्यंत वाहतुक नियमाचे भंग करणारे वाहन चालक यांच्या विरुध्द १७,८,३५ चालन करुन १,८८,९८,१००/- रुपये दंड आकारण्या आला. त्यापैकी चारचाकी वाहनावर १५,९,८१ केसेस करुन १,७८,९३,७००/- रुपये दंड आकारण्यात आला तसेच मोटार सायकल चालक यांच्या विरुध्द १८५४ केसेस मध्ये १००४४००/- इतर दंड आकारण्यात आला आहे. सदर केसेस पैकी २२,०१,८००/- रुपये एकुण दंड वसूल करण्यात आला आहे.



# पैठणमध्ये मच्छीमारांचा विराट मोर्चा

## शासनाचे लक्ष वेधन्यासाठी गळयात मासे, खेकड्याच्या माळा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जायकवाडी जलाशयावर तरगते सौरऊर्जा प्रकल्प होत असल्याने त्या प्रकल्पाच्या नियोजनाचे काम सध्या धरण परिसरात पाहणी सुरू असल्याने या सौरऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक मच्छीमार, कहार, भोई, भिल्ल समाजातील हजारो कुटुंबावर उपासमारीची वेळ येवू शकते. त्यामुळे सौर ऊर्जा प्रकल्पामुळे पाण्यात त्याचे रेडिएशन होऊन नैसर्गिक मत्स्य उत्पत्ती होणार नाही त्यामुळे मत्स्यबीज उत्पत्ती न झाल्यास जलाशयातील मत्स्य संपूर्ण संपुष्टात येईल. जायकवाडी जलाशया हा 36 हजार हेक्टर जलसाठा असून प्रतिवर्षी 70 % पाणी साठा कमी होऊन जुन अखेर फक्त 30 % म्हणजे मृत साठा शिल्लक राहतो आणि त्यावर जर सौरऊर्जा प्रकल्प राबवल्यास संपूर्ण पाणी झाकून जाईल आणि त्यामुळे पाण्याची गटारगंगा होईल आणि परिसरात प्रचंड प्रमाणात रोगराई निर्माण होईल. पारंपरिक मच्छिमारांचा मासेमारी हाच प्रमुख व्यवसाय असुन मासेमारीवरच मच्छिमारांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे आणि 80 % मच्छिमार हा भुमिहिन असल्याने मासेमारी हेच उपजिविकतेचे साधन असल्याने प्रत्यक्षात 20 ते 25 हजार मच्छिमार कुटूंबे मासेमारी करत असून त्यावर 1 ते सव्वा लाख लोकांचे जीवनमान अवलंबून आहे. पाण्यावर तरंगत्या सौरऊर्जा प्रकल्प जेथे मोठ्या प्रमाणात मच्छिमारांची उपजिविका चालते आशा कोणत्याही ठिकाणी असा प्रकल्प राबविण्यात येऊ नये तो जेथे शाश्वत पाणी साठा आहे म्हणजे असे प्रकल्प समुद्रात किंवा जिरायत भागात जेथे शेती पिकवली जात नाही आशा ठिकाणी प्रकल्प राबविण्यात यावेत.

यासह विविध मागण्यांसाठी संभाजीनगर, अहमदनगर, जालना तसेच गोदावरीच्या काठावरील मच्छीमार,कहार, भिल्ल,भोई समाज सोमवारी पैठण येथे जवळपास १० हजारापेक्षा जास्त संख्येने एकवटला होता. जायकवाडी जलाशयावरील सौरऊर्जा प्रकल्प रद्द झालाच पाहिजे यासाठी कहार समाज कुटुंबासह पैठण येथे जमा होवून विराट मोर्चाच्या माध्यमातून शहरातून घोषणाबाजी करत गळ्यात चिलापी मासे,खेकडे,पारंपरिक मासे पकडण्याचे जाळे असा वेश परिधान करुन तहसीलदार यांना निवेदन देवुन शासनाचे लक्ष वेधले यावेळी पैठण कहार समाजाच्या वतीने यामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

# डॉ. संतुजी लाड यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज


**सोयगाव :** सावळदबारा येथे सत्यशोधक समाजाचे अग्रदुत, हिंदू खाटीक समाज भुषण,थोर समाज सुधारक डॉ. संतुजी रामजी लाड यांच्या पुण्यतिथी निमित्त हिंदू खाटीक समाजातर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले. डॉ. संतुजी लाड जीवन चरित्रावर शांताराम खराटे यांनी विचार मांडले. भोकरे सर व समाज बांधव यांनी पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी पंचक्रोशीतील गावातील प्रतिष्ठित नागरिक व आजी-माजी नेते मंडळी यांनी डॉ. संतोजी लाड व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पगुच्छ अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जयप्रकाश चव्हाण व सरपंच पती शिवाप्पा चोपडे, गुलाबराव कोलते, उपसरपंच मोहम्मद आरिफ, माजी सरपंच मोरसिंग चव्हाण,भाऊराव कोलते, मुकुंदा मानकर, दीपक बुढाळ, संदीप कोलते, योगेश खैरे, एकनाथ सपाटे, दीपक मानकर शंकर खराटे, सुनील माकोडे, कृष्णा माकोडे, सुभाष खराटे, गणेश खराटे, रमेश खराटे,अमोल रावळकर,राजु खराटे,विजय रावळकर,भिवसन रावळकर, किशोर रावळकर, कैलास रावळकर, मंगेश रावळकर, व महिला माता आदी उपस्थित होते. शांताराम खराटे यांनी डॉ. संतुजी लाड यांच्या कार्याचा उल्लेख केला.





महाराष्ट्र Business Katta












# नांदेडात मृत्यूकांड घडले का ?





आधुनिक केसरी

**नांदेडच्या स्व. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयात मृत्यूकांड घटना घडल्याचे वृत्त वाहिन्यांनी दिले. त्यावरून राज्यात गोंधळ उडाला व राजकीय नेते नांदेडकडे पळत सुटले! यातून सहानुभूती मिळण्यासाठी राजकीय स्पर्धा व कलगीतूराही सुरु झाला! या गंभीर रुग्णांचे मृत्यूचे कारण काय ? याची शहानिशाकोणीलाही करावी वाटलेली नाही. त्यात वैद्यकीय समितीच्या चौकशीत त्या रुग्णांचा मृत्यू हा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे अथवा औषधोपचारी अभावी झालेला नाही, हे स्पष्ट झाले आहे. या मृत्यूकांडाचे आधारहीन वृत्त कोणी पेरले ? यावर प्रकरणावर दोन्ही बाजूंनी राजकारण झाले. पण यामुळे गरीब व सामान्य माणसाचा शासकीय सेवेवरील विश्वास उडत भीती वाटत आहे. याचे परिणाम गरिबांच्या आरोग्य सेवेवर होणार आहेत. याचा विचार केला गेला नाही.**

महाराष्ट्रात शिंदे- फडणवीस आणि अजित पवार या तीन नेत्यांचे सरकार आहे. हे सरकार संवेदनशील आहे काय अस म्हंटले जात ? पण वृत्तामुळे राज्याच्या आरोग्य विभागाची झोप उडाली. राज्याचे वैद्यकीय उच्च शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ तातडीने नांदेडला आले! केवळ सत्ताधारी नव्हे, विरोधी पक्षाचे नेते धावले. या घटनेत राजकीय नेत्यांचा उताळवीण-पणा आणि गांभीर्यशून्यवृत्ती पहावयाला मिळाली. देशात व राज्यात काही राज्यात रुग्णालयात साथीच्या आजाराने अथवा अज्ञात आजाराने रूग्ण मृत पावल्याची घटना घडलेल्या आहेत. तसेच रुग्णालयातील निष्काळजीपणानेही रूग्ण मृत पावले आहेत. पण नांदेडच्या वैद्यकीय महाविद्यालयातील घटना वेगळी आहे.चोवीस तासात चोवीस रुग्ण मृत पावले, हे खर आहे. पण त्याला कारणे वेगळी आहेत, दररोजमृत्यूची नोंद केली जातेय! रूग्णालयातील एका 'विबीषणा'ने या मृत नोंदीची एक प्रत मिडीयाला दिली. मीडियाने याला अधिकृत दुजोरा मानत २४ तासांत २४ मृत्यू तांडवाचा बोभाटा सुरू केला! या घटनेची प्राथमिक माहिती घेण्याचा शहाणपणा कोणीही दाखवला नाही. कारण यातून सर्वांना सहानुभूती मिळविण्याची घाई लागली होती. याच रुग्णालयाने करोना अनेकांचे प्राण वाचविले आहेत!त्यांच्या त्या कर्तव्याचा व सेवेचा विसर झाला. पण घटनेतील सत्य बाहेर आले! ते म्हणजे, राज्याच्या आरोग्य विभागाचा बेफिकीरपणा, ढिसाळ नियोजन चव्हाट्यावर आले. आरोग्य विभाग म्हणजे,' आंधळ दळतयं कुत्र पीठ खातय' असेच चालले आहे. त्यात शासनाचा कामाचा प्राधान्य कोणता ? याचा विसर पडला आहे, राज्यात पाणी,आरोग्य शिक्षण तीन प्रश्नाकडे शासनाने गांर्भिर्याने लक्ष द्यावयास पाहिजे. हे सरकारन देत नाही, असे दिसतेय. या आरोग्य विभागाला पुरेशी आर्थिक तरतूद न करणे, जागा न भरणे, औषधी पुरवठा व वितरण व्यवस्थेत गोंधळ या बाबी या निमित्ताने होईना चर्चेला आल्या. सरकार व प्रशासनाला डूलकी लागली होती. आता ते जागे झाले दिसत आहे. हे सरकार जर लोकप्रतिनीधींना विकासाच्या नावावर खिरपतीप्रमाणे कोट्यवधीचा निधी देत आला आहे! मग तो निधी नेमका कोठे खर्च होतो ? हा निधी रस्ते व इतर बांधकामावरच खर्च केले जातात! कारण कंत्राटदार त्यांचा व कमीशन ठरलेल असत!मग झाला विकास!राज्याचे सरकारला व कृषी विभागाला शेतकरी मला तरी चिंता नाही,कारण कृषी प्रशासन त्या कुटुंबाच्या दारापर्यंत जात नाही. ज्या घरी शेतकरी मृत पावला त्या कुटुंबाने मदतीचा प्रस्ताव दाखल केला पाहिजे, खेटे मारले पाहिजे. त्याशिवाय सरकारी मदत मिळत नाही.अशीच घटना हळदा ( ता.कंधार) शेतकऱ्याची दोन मुले मृत्यू पावली पण नांदेड व कंधार कृषीविभाग २०१७ अजून झोपलेला आहे. ते कुटुंब भीक मागतेय! तरी राज्य शासन प्रशसनाला दया येत नाही, आर्थिक मदत दिली जात नाही. नांदेड शहराच्या मध्यभागी निजामकालीन इमारतीत शासकीय जिल्हा रुग्णालय अनेक वर्षापासून चालत होते. रुग्णालयात अतिदक्षता विभाग, बाल विभाग, प्रसुती विभाग, ओपीडी विभाग होते. इतकेच नव्हे, अपघात वार्ड होता! तोही चोवीस तास चालू डॉक्टर असावयाचा. नांदेड जिल्ह्यातील व बाहेरील जिल्ह्यातील रूग्ण उपचारासाठी येत असत. तेव्हा लोकांचा खासगी रुग्णालयापेक्षा शासकीय रुग्णालयावर विश्वास होता वैद्यकीय अधिकाऱ्यांची शासकीय सेवेला प्राधान्य देत असत! तेव्हा रुग्णालयात डॉ. माधवराव किन्हाळकर, डॉ. हंसराज वैद्य, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. चिद्रावार, डॉ. बिलोलीकर डॉ पेद्दावाड , डॉ. गफार तसेच महिला डॉकटरांनी या शासकीय रुग्णालयात सेवा दिली आहे. राज्यात शासखीय रुग्णालयात सर्वसोयी मोफत होत्या! नंतर तत्कालिन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी राज्यातील शासकीय नाममात्र दराने आरोग्य सेवा देण्याचा निर्णय घेतला. त्यात नोंदणी शुल्क. तसेच एक्सरे व आदीसाठी वेगळे शुल्क निश्चित केले गेले. आजही विविध आरोग्य सेवा शुल्क आकारले जातात! तेव्हा केवळ अति गरीब असलेल्या रुग्णांना मोफत औषध दिले जायचे! सर्वांना नाही.नांदेड शहरात मोजके खाजगी डॉक्टर व रुग्णालय होते!आज नांदेड शहरात पाच हजाराच्या वर खासगी डॉक्टर व रुग्णालयाचे कॉलनी आहेत. हे डॉक्टर मंडळी ऑनलाईन पैसे स्विकारत नाहीत. त्यांना लाखोची रोकड पाहिजे असते! मग आयकर विभाग झोपले काय ? महाराष्ट्रात खाजगी वैद्यकीय महाविद्यालय परवानगी देण्याचे वारे सुरु झाले! तेव्हा नांदेडात कलामंदिर भागात एका राजकीय नेत्यांनी खासगी रुग्णालयाचा फलक लावला. ही बाब पत्रकार म्हणून मी स्व. शंकरराव चव्हाण यांचे निर्दशनास आणून दिली! त्यांनी माहिती घेतली व खात्री केली. तेव्हा ते राज्याचे मुख्यमंत्री होते. नांदेड जिल्ह्यात खासगीपेक्षा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु केले, तर गरीब मुलांना अधिक लाभ मिळेल हा त्यांचा चांगला हेतू होता. त्यांनी तातडीने शासकीय पातळीवर हालचाली सुर केल्या! पण त्यासाठी आधी जागा व इमारत असणे आवश्यक बाब होती! त्याशिवाय तातडीने महिविद्यालय सुरू करण्यास अडचण येत होती. तेव्हा शासकीय रुग्णालयाची खाटांची संख्या वाढून तेथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला गेला. दि. २६ जून १९८८ रोजी नांदेडच्या वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी मिळाली. याचे श्रेय स्व.शंकरराव चव्हाण यांनाच आहे.शासकीय रुग्णालयाची समोरील जागा ही बांधकाम विभागाची होती. ती अपूरी पडत होती. तेव्हा महाविद्यालयासाठी मागील जागा मिळविण्याचे प्रयत्न सुरु झाले!पण ती जागा सचखंड गुरुव्दारा बोर्डाची होती. प्रशासनाने जागेबाबत गुरूव्दारा बोर्डाकडे प्रस्ताव ठेवला. नांदेडच्या विकासात गुरुव्दारा बार्डाचे मोठे योगदान आहे, हे विसरता येणार नाही. वैद्यकीय महाविद्यालयास जागा शीख बांधवाचा जागा देण्यास विरोध होता. पण चर्चेनंतर श्री गुरूगोविंदसिंघजी यांचे नावाने वैद्यकीय व रुग्णालय सुरु करण्याची अटीवर ते मान्य झाले. हे महाविद्यालय ११ एकरावर सुरू होते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालया जागा देण्याचा असाच प्रश्न होता! तेव्हा शीख तरूणांचे शिष्टमंडळ माझ्याकडे निवेदन घेवून आले होते बोर्डाची जमीन देण्याच्या विरोधात होते. मी तरुणांना नांदेडला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु होत आहे, त्याला तर आपले सहकार्य असले पाहिजे, असे सांगितले! पण यात आमचा फायदा काय ? त्यावर मी त्यांना गुरुद्वारा बोर्डातर्फे अभियांत्रिकी महाविद्यालयात काही जागा राखीव जागा ठेवाव्याची मागणी करा! अशी त्यांनी सूचना केली. यात माझा मोठेपणा म्हणून सांगत नाही, वस्तस्थिती आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला गुरू गोविंदसिंघजी यांचे नाव देण्यात आले आहे. त्यात राखीव जागा आहेत!त्यातून शीख तरुणांना संधी मिळते आहे. एका वरीष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांने आपल्या मुलाचे नाव या कोट्यातून दिले होते. शहरात वैद्यकीय महाविद्यालय सुरळीत सुरु झाले होते. वैद्यकीय महाविद्यालयासाठी स्वतंत्र जमिनीचा शोध सुरू झाला. नांदेडपासून दहा ते बारा कि.मी. अंतरावर विष्णुपूरी येथील ११५ एकर जमीन संपादित करण्यात आली. त्यासाठी लागणारा निधी त्यानंतर प्रकिया इमारत बांधकामासाठी निधी यात १७ वर्षे निघून गेली.नंतर दि. २६ आक्टोबर २०१५ रोजी महाविद्यालय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय स्थलांतरित करण्यात आले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजूरीच्या यादीत चव्हाणांचे नाव नव्हते! त्यानंतर थाटात सोहळा पार पडला. या महाविद्यालयासाठी नेते आशोक चव्हाण हे यांचाच पाठपुरावा होता! पण त्यांच्या राजकीय हट्टापायी शहरातील शासकीय रूग्णालय न ठेवता ते स्थलांतरित केले गेले. त्यामुळे खाजगी रुग्णालयाचे चांग भले झाले! ते आजही गल्ला भरुन घेत आहेत. गेल्या आठ वर्षे या महाविद्यालयाचा अस्वच्छता, वैद्यकीय उपकरणे, अपूरा कर्मचारी पूर्णवेळ अधिष्ठाता, तज्ज्ञ डॉक्टर नसतानाही कारभार चालू होता. तेव्हा सत्ताधारी असो विरोधी पक्ष नेत्यांनी दुर्लक्ष केले. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी २९ जून २०२१ रोजी या वैद्यकीय महाविद्यालयाला १९ कोटी रुपये दिल्याचे वृत्त होते! तो निधी कोठे खर्च झाला ? पालकमंत्री म्हणजे बैठकीचे धनी! ते उंटावरून शिळ्या हकालतात. त्यांनी जिल्ह्याचे पालकत्व निभावले का ?अशोक चव्हाणांची यांचीही जबाबदारी होतीच म्हणा!. केवळ रोपटे लावून चालत नाही त्याचे संगोपण करावे लागते! त्यांचेही याकडे दुर्लक्ष आहे. पण पक्ष' नांदेडचा विकास झाला तर तो साहेबामुळे आणि आज वाटोळे झाले ते विरोधकामुळे'अशी टीका केली जाते. जिल्ह्यातील बरे अथवा वाईटाची जबाबदारी पळ काढणे योग्य नाही. यात चव्हाणांच्या आशीर्वादामुळे मोहनराव हंबर्डे हे दक्षिणचे आमदार झाले. ते विष्णूपूरी गावचे! त्यांच्या कार्यक्षेत्रात हे रूग्णालयात येते. ते तेथे किती वेळा गेले. त्यांना समस्याची माहिती नाहीत काय ? पाठपुरावा केला काय ? यासाठी रस्त्यावर उतरले काय ? मग त्यांची नैतिक जबाबदारी नाही ? मग थेट राज्याच्या आरोग्य मंत्र्याचा राजीनामा मागणे, हे कितपत योग्य ? या घटनेची तीन सदस्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पथकाने चौकशी केली. त्यात ते रुग्ण डॉक्टराच्या निष्काळजीपणामुळे अथवा उपचारा अभावी किंवा औषध अभावी मृत पावलेले नाहीत. हे निष्पन्न झाले आहे. घटनेबाबत तेंव्हा नातेवाईकाच्या तक्रारी नव्हत्या. मग मृत्यू घटनेला वेगळे वळण व राजकीय स्वरूप कोणी दिले ? घटनेचे वृत्त देतांना रूग्णालयाची बाजू समजून घेतली गेली नाही.या खळबळ उडते म्हणून वृत्त देण्याची घाई केली गेली.हे पत्रकारांनी जबाबदारीने व गांभीर्यने दिलेले नाही. यात ब्रेकींग न्यूज"ने गोंधळ उडवून दिला. याच रुग्णालयात २४ तासात ९७ रुग्ण ठीक होवून घरी परतले, ही मात्र ब्रेकींग न्यूज होत नाही. घटनेपूर्वी तीन दिवस सुट्या होत्या! त्यामुळे शहरातील खासगी डॉक्टर रुग्णालय बंद करुन मज्जा करायला गेले होते! त्या काळात गंभीर आजारी रुग्ण अधिक आले व रुग्णालयाने दाखल करुन घेतले गेले. त्यांनी नाकार दिला नाही, अथवा वाऱ्यावर सोडलेले नाही. खाजगी रुग्णालयात गरीब कुटुंबाला आर्थिक शोषण केले जाते. रूग्णाला इतरत्र नेण्याचा सल्ला दिला जातोय. शेवटी गरीब कुटुंब त्या रुग्णांना शासकीय रूग्णालयात घेवून जातात, तेथे मृत्यू पावतो! मग मृत्येचे खापर वैद्यकीय रूग्णालयावर फोडले जाते. हा नेहमीचा प्रकार सुरु आहे. या रुग्णालयात ५०७ संख्या खाटांची रुग्णांची संख्या सुमारे बाराशे आहे. यात गंभीर मृत रुग्णांची संख्या १५ ते १६ च्या असते, असे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यांचेदृष्टीने सामान्य वाटत होती. केवळ नांदेडच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लक्ष्य का गेले ? राज्यातील व नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण रूग्णालय, सामान्य रुग्णालयाचे हाल काय आहेत ? याकडे कोणाचे लक्ष आहे काय ? तसेच नांदेडात दुसरे आयुवैद महाविद्यालय आहे.त्याकडे कोणी नेते फिरकले नाहीत. जुन्या नांदेड भागात आयुर्वेद रुग्णालय होते, ते बंद केले गेले. त्या जागेवर तर काही नगरसेवकांनी अतिक्रमण केले.नंतर इतवारा पोलिस स्टेशन तेथे आणले गेले. नांदेड शहरात मनपाची रूग्णालयात आहेत. या रूग्णालयात सर्व आरोग्य सुविधा आहेत काय ? खासगी डॉक्टराकडे रूग्णांच्या रांगा लागलेल्या असतात. शहरात रोज नवीन रुग्णालय सुरू होते आणि नेते याचे फित कापायला जातात! नांदेडच्या गंभीर रूग्णांना उपचारासाठी हैद्राबाद व मुंबई येथे न्यावे लागते, हे दुर्देव आहे! हे राजकीय अपयश नाही काय ? २००८ मध्ये 'गुरुता गद्दी'च्या सोहळयाच्या निधीतून सेवा भावी संस्थाच्या मदतीने अद्यावत रुग्णालय उभारावे, तशी सूचनी केली होती. पण हा निधी मनपाच्या रुग्णालयाच्या रंग-रंगोटीवर खर्च केला. गुरुव्दारा बोर्डाचे स्वतंत्र रुग्णालय आहे. जिल्ह्यातील आरोग्य या गंभीर समस्येबाबत राजकारण बाजूला सर्व नेत्यांनी एकत्रित येवून प्रशासकीय बैठक घेवून निर्णय घेतला असता तर भविष्यात हे प्रश्न सुटण्यास मदत झाली असती. आता शहरात पाचशे खाटांच्या रुग्णालयाचा प्रस्ताव पाठविला गेला आहे. हे बरे झाले! पण या घटनेबाबत वस्तुस्थिती लक्षा न घेताच रुग्णालयाला लक्ष्य केले गेले. यातून सामान्य माणसाचा शासकीय आरोग्य सेवेवरील विश्वास उडेल, याची भीती वाटत आहे. तेव्हा आता तरी तो विश्वास अधिक वाढेल, यासाठी सर्वांनी काळजी घेणे आणि प्रयत्न करण्याची गरज आहे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850







# नवरात्र-उत्सव सृजनांचा

आधुनिक केसरी

**आपला देश पूर्वापार कृषि प्रधान आहे. आजही आपल्या देशातील बहुतांश शेती पावसावरच अवलंबून आहे. पावसाच्या या चार महिन्यातच आपले सण का असावेत याचं उत्तर शेती आणि पाऊस यांच्या संबंधातच आहे. या दरम्यान झाडंन झाड पाना फुलांनी बहरून गेलेलं असतं. पावसामुळे अवघी धरित्री हिरवा शालू नेसून उभी असते. अवघ्या आसमंतात चैतन्य भरून राहिलेलं असतं. याच दरम्यान वटसावित्रीपासून सुरु होणारे आपले सण, नाव कुठल्याही देवाचे असलं तरी, सृजनाची पूजा करणारे आहेत. असंस्कृत, भरकटलेल्या मानवाला स्थिर करून, कुटुंब व्यवस्थेच्या आणि संस्कृती निर्मितीच्या दिशेने एक मोठी झेप घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या शेतीची व जिच्यामुळे शक्य होते, भूमातेची कृतज्ञता व्यक्त करणारे आहेत. असंस्कृतीकडून संस्कृतीकडे माणसाने घेतलेली ही एक फार मोठी झेप होती. म्हणजे एका अर्थी माणूस सुसंस्कृत झाला तो स्त्रीमुळे.**

आजही नवीन बाळाला आपण आपापल्या संस्कृतीचं बाळकडू पाजलं जातं, ते त्याच्या आईकडूनच. माणसाला स्थिर करणारी भूमी आणि सुसंस्कृत करणारी स्त्री या दोघींना देवी स्वरू न मिळतं तरच नवल ! स्त्री आणि भूमी या दोघीत विलक्षण साम्य आहे. दोघीही निर्मात्या आहेत. सृजनशील आहेत.

दोघीही पोशिंद्या आहेत. अवघ्या सजीव सृष्टीचं असणं हे ह्या दोघींवरच अवलंबून आहे. या दोघी सजीवांना जन्म देतात. पोसणाऱ्याही आणि रक्षणकर्त्या ह्याच दोघी. शेवटी आपल्याच कुशीत चीरनिन्द्रा देणाऱ्याही या दोघीच. माती आणि माता या दोघांमध्ये विलक्षण साम्य आहे. मातीच्या गर्भातून उगवलेलं पिक हे मातीचं जणू अपत्यच आहे.स्त्री आणि जमीन यांच्यातलं हे साम्य मनाला नक्कीच मोहवणारं आहे. म्हणून तर नववधूला हिरव्या साडीचं महत्व, तिची कूस भूमिप्रमाणे सदा हिरवी राहो हीच हिरवा रंग दर्शवतो. सौभाग्याचा हिरवा रंग फळलेल्या- फुललेल्या निसर्गातून, सृष्टीतून घेतला आहे. आपले सण वर्षा ऋतूमध्येच का यावेत आणि ह्यातील बहुतेक सर्व सण स्त्रीप्रधान का असावेत, याचं उत्तर माही आणि महिला या दोघींमधील साम्यात आहे. वटसावित्रीपासून सुरु होणाऱ्या आपल्या सर्वच सणांमध्ये स्त्रियांची भूमिका फार महत्वाची असते. वटसावित्री कथेत सावित्रीने सत्यवानाचे प्राण आपल्या चातुर्याने यमाकडून परत मिळवले. पण पूजा मात्र वादाच्या झाडाला फेरे मारून करते. पारंब्या कुठल्या आणि मूळ कुठलं हे आपल्याला कळू न देणारा वटवृक्ष हा सतत वर्धिष्णू असतो. स्त्रियांनी वटवृक्षाची पूजा करण्यामागे तिची ' तुझ्यासारखंच माझ्याकडूनही वंश सातत्य कायम राहावं' हीच भावना असावी. स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंतकाळची माता





असतेअसं का म्हणतात, ते इथे लक्षात येईल. ती पत्नी बनते, तीच मुळात तिची आदीम प्रेरणा असलेल्या मातृत्व प्राप्तीसाठीच. गणपतीनंतर सुरु होणारा नवरात्रोत्सव तर साक्षात स्त्रीच्या 'स्त्रित्वा' चा, तिच्या सृजनशीलतेचा उत्सव. सबंध देशात साजरा होणारा नवरात्राचा नऊ दिवसानाचा तो सोहळा. स्त्रीच्या गर्भारपणाच्या नऊ महिन्याचं पूजन आहे. त्या नऊ महिन्यांची पूजा या नऊ दिवसात आपल्या संपूर्ण देशात केली जाते. सत्तावीस नक्षत्रातून पावसाची नऊ नक्षत्र वजा केली की उरतं ते फक्त शून्य हे बिरबलाच उत्तर जेवढं भूमी-शेतीच्या संबंधात खरं आहे, तेवढंच ते स्त्रीच्या मातृत्वाच्या बाबतीतही सत्य आहे. पावसाच्या नऊ नक्षत्रात भूमी प्रसवते, तशीच नऊ महिन्यानंतर नवीन जीवाला जन्म देते, आणि माणसाचे वंश सात्यत टिकवते. एखाद्या स्त्रीला मुल होतं नसेल तर तीच 'पोटपाणी पिकत नाही' असं म्हणतात. ते तिच्या भूमीच्या असलेल्या साम्यामुळेच. स्त्रीच्या आयुष्यातले हे नऊ महिने वजा केले तर पृथ्वीवरील मानवाचं अस्तित्वच नाहीस होईल. नवरात्रोत्सव दुर्गा, भवानी, लक्ष्मी, सरस्वती आदि देवींच्या पूजनाचा सोहळा असला तरी, ती पृथ्वीतलावरच्या तमाम स्त्रीत्वाच्या गौरवाचा आणि पूजनाचा सोहळा आहे. मातृत्वाची ही महापूजा आहे. सृष्टीतील सर्वच सजिवांच अस्तित्व अवलंबून असलेल्या सृजनाच्या उत्सवाचा हा सोहळा आहे. नवरात्राच्या पहिल्या दिवशी घटस्थापना केली जाते. या दिवशी एक कलशात धान्य आणि पाणी भरून त्यामध्ये एक सुपारी, एक हळकुंड, अक्षदा, थोडेसे पैसे इत्यादी ठेवलं जातं. या कलशावर आंब्याचे किंवा विड्याचे पण ठेवून्त्यावर नारळ ठेवतात. काही ठिकाणी मातीच्या घटात दिवा लावला जातो. हा दिवा नऊ दिवस सतत तेवत असतो. या कलशाला नऊ दिवसाच्या प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या पाना-फुलांनी पुजलं जात. यात प्रांताप्रांतानुसार फरक असला तरी भावना तिचं, वंश सात्यताची मातृत्वाच्या पूजनाची असते. घरी स्थापन केलेला कलश अथवा मातीचा घट म्हणजे स्त्रीच्या गर्भाशयाचे प्रतिक आणि त्यात नऊ दिवस सात्यत्यानेमंदपणे तेवत असलेला दिवा म्हणजे त्या ' गर्भाशयात फुंकला गेलेला प्राण.' दिवा हे प्राणाचं प्रतिक मानलं गेलं आहे. परातीत रुजत घातलेलं धान्य आणि शेजारच्या मातीच्या घटात तेवत असलेला दिवा भूमीच्या उदरातून वर येणारं धान्य आणि स्त्रीच्या गर्भाशयात वाढत असलेला गर्भ यातील साम्य दर्शवतात. नऊ दिवसांचा नवरात्रोत्सव म्हणजे स्त्रीच्या नऊ महिन्यांचा गर्भार अवस्थेचा सन्मान असून दहाव्या दिवशी साजरा होणारा दसरा नवजात बाळाचं गर्भाशयातून या जगात होणाऱ्या सीमोल्लंघनाच प्रतिक आहे. नऊ महिन्यांचं गर्भारपण संपवून बाळाचा होणारा जन्म मातीच्या उदरातून तरारून येणाऱ्या पिकापेक्षा वेगळा नाही. म्हणून तर दसऱ्याला दरवाज्यावर लावल्या जाणाऱ्या तोरणात आंब्याची पानं, झेंडूची फुलं असं काही असलं तरी शेतात नुकत्याच तयार झालेल्या भाताची ओम्बी म्हणजे मातेच्या उदरातून सीमोल्लंघन करून कुटुंबात आलेल्या नवीन जीवाचं प्रतिक आहे. नवरात्रातल्या प्रत्येक माळेचं वैशिष्ट्य वेगवेगळ असलं तरी आठव्या माळेला म्हणजे अष्टमीला विशेष महत्व आहे. असं का याचा विचार करतांना घरातील जेष्ठ बायका आठव्या महिन्यातील बाळंतपण म्हणजे काठीन्न असं म्हणायच्या. नवमी तर साक्षात बाळ जन्माचा दिवस आणि दसऱ्याला आईच्या उदरातून सीमोल्लंघन करून जगात आलेल्या बाळाच्या आगमनाचा आनंद अवर्णनीय असतो. उगाच नाही दसरा साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्वाचा मानला जातो. असा हा नवरात्रोत्सवमातृत्वाचा उत्सव आहे. म्हणुन तर स्त्रीची ओळख माता आहे.

"या देवी सर्वभूतेषु मातृ-रूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।।"

असं म्हणून सर्व चराचर व्यापून राहिलेल्या स्त्रीच्या सृजन शक्तीला, आपल्या संस्कृतीने मातृ रुपात गौरवलेलं आहे. देव्हाऱ्यातून सार्वजनिक मंडळाच्या मंडपात येवून बसलेला. संपूर्ण विश्वाचा अधिपती असलेला गणपतीचा, संकोच होऊन तो त्या त्या विभागाचा राजा, महाराज, सम्राट वगैरे झाला असला तरी, काही दिवसांनी त्याच मांडवात बसणाऱ्या देवीची अद्याप राणी, महाराणी, सम्राज्ञी झालेली नाही. कारण मातृत्वापुढे ही सर्व पदं अगदी शुल्लक आहेत याची नकळतची जाणीव आपल्या रक्तातच आहे. देवी ही माताच आहे आणि माताच राहणार आहे अगदी जगाच्या अंतापर्यंत.

श्रीपाद टेंबे
९१५८०८८०४२

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कळवणला दिलेला शब्द खरा केला

## श्री सप्तश्रृंगी गड परिसर विकास आराखड्याला ८१ कोटी ८६ लाख रुपयांची मंजुरी

आधुनिक केसरी न्यूज

**दीपक सोनवणे**

**कळवण :** देश व राज्यभरातून भाविक सप्तश्रुंगी देवीच्या दर्शनासाठी येत असतात भाविकांच्या सोयी



सुविधासाठी काम करणे महत्वाचे असल्यामुळे सोमवारी ९ ऑक्टोबरच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत ८१ कोटी ८६ लाख रुपयांच्या सप्तश्रुंगी गड परिसराच्या विकास आराखड्याला मंजुरी देण्याचा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कळवणकरांना दिला होता तो शब्द खरा ठरवत आज झालेल्या उच्चधिकार समितीच्या बैठकीत विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे. या प्रश्ना संदर्भात स्थानिक कळवण सुरगाण्याचे आमदार नितीन पवार हे आग्रही असल्यामुळे त्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वाढदिवसाची अनोखी भेट दिल्याचे बोलले जात आहे.आमदार नितीन पवार यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित शेतकरी व कृतज्ञता मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार हे शनिवारी कळवणला आले होते. मेळाव्यात आमदार नितीन पवारांनी कळवण व सुरगाणा तालुक्यातील विविध विकासकामांच्या मागणीबरोबर सप्तश्रुंगी गड परिसर विकास आराखड्याला मंजुरी देण्याची आग्रही मागणी मेळाव्यात करुन लक्ष वेधले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इतर मागण्या मान्य करताना श्री सप्तश्रुंगी गड परिसराच्या विकास आराखड्याला मंजुरी देण्याबाबत शनिवारी मेळाव्यात आश्वस्त केले होते. आज सोमवारी सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री दादा भुसे व दूरदुश्यप्रणाली द्वारे आमदार नितीन पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विकास आराखड्याला मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला. सप्तशृंग गड तीर्थक्षेत्र स्थळाला मूलभूत व पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी विकास आराखडा शासनास सादर केला होता.आमदार नितीन पवार यांनी सप्तश्रुंग गडावरील सुचविलेल्या विकास कामांचा आराखडयात समाविष्ट करण्यात येऊन उच्चाधिकार समितीने दिलेल्या सूचनांप्रमाणे मूळ आराखड्यात बदल करून सुधारित आराखडा अंदाजपत्रकांसह ग्रामविकास विभागाला सादर करण्यात आला होता.

**नवरात्रोत्सवात सप्तशृंगी मातेचे मंदिर दर्शनासाठी २४ तास खुले**

: उत्तर महाराष्ट्राचे कुलदैवत सप्तशृंगी देवीचा नवरात्र उत्सव १५ ऑक्टोंबरपासून सुरू होत असून उत्सवाच्या दृष्टीने कळवण येथील प्रांत तथा सहाय्यक जिल्हा अधिकारी विशाल नरवाडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व शासकीय विभागांची नियोजन आराखडा आढावा बैठक ट्रस्टच्या चिंतन हॉल येथे घेण्यात आली . कळवण येथील तहसीलदार रोहिदास वारुळे गटविकास अधिकारी निलेश पाटील व्यवस्थापक सुदर्शन दहातोंडे कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे आभोणा पोलीस निरीक्षक यशवंत शिंदे सहाय्यक पोलिस निरीक्षक बबन पाटोळे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली . बैठकीत विविध विभागांनी यात्रा कालावधीत आपली जबाबदारी चोख पार पाडण्याचे आदेश नरवडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले . भगवतीचे दर्शन सुलभ व्हावे यासाठी खास सोय करण्यात येणार आहे मंदिर भाविकांना दर्शनासाठी २४ तास खुले ठेवण्यात येणार आहे . यात्रा कालावधीत नांदूरी येथे वाहन पार्किंग ची व्यवस्था करण्यात येणार आहे . यात्रा उत्सव कालावधी सप्तशृंगी गडावर खाजगी वाहनांना बंदी घालण्यात आली आहे, तर परिवहन महामंडळाच्या वतीने २२५ बसेस उपलब्ध राहणार असल्याचे व्यवस्थापनाने सांगितले . सप्तशृंगी गडावरील स्थानिकांना महत्वाच्या कामासाठी गावातील वाहनांना पासेसची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे सांगितले . स्वच्छतेसाठी कंत्राटी कामगारांची नेमणूक ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात येणार आहे . पिण्याच्या पाण्यामध्ये टीसीएल टाकून जलशुद्धीकरण करण्यात येणार आहे . तात्पुरती स्वच्छतागृह उभारण्यात येणार असून गावातील सर्व पथदिपांची दुरुस्ती करण्यात येणार आहे नवरात्र उत्सव दरम्यान नाशिक जिल्हा परिषद व पंचायत समिती कळवण व आरोग्य विभागाच्या वतीने सप्तशृंगी नांदूरी येथे येणाऱ्या लाखो भाविकांचे वैद्यकीय सेवेसाठी वैद्यकीय अधिकारी आरोग्य सहाय्यक आरोग्य सेवक आरोग्य सेविका परिचर तज्ञ डॉक्टरांच्या नेमणूक करण्यात येणार आहे . तसेच रुग्णांसाठी ट्रस्ट व जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्याकडून रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे . सप्तशृंगी निवासिनी देवीचा नवरात्र उत्सव यात्रा कालावधीत ट्रस्ट तर्फे भगवती मंदिर सभा मंडप पाणीपुरवठा वीज पुरवठा आरोग्य महाप्रसाद तसेच परिसर बंदोबस्त साफसफाई पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे . तसेच सुरक्षेच्या दृष्टीने नारळ फोडण्यास पहिल्या पायरीजवळ पाच मशीनची सोय करण्यात आली आहे . कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नांदुरी व सप्तशृंगी गड येथे पोलीस निरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक महिला पोलीस निरीक्षक पोलीस कर्मचारी महिला पोलीस कर्मचारी महिला पुरुष होमगार्ड नागरी संरक्षण दल ग्रामसुरक्षा दल अग्निशामक दल आदींचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे . महाराष्ट्र राज्य परिवहन नाशिक विभागातून व कळवण आगारातून यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना नांदुरी ते सप्तशृंगी गड दरम्यान बसेसची व्यवस्था करण्यात येणार आहे . तसेच जळगाव धुळे व इतर ठिकाणी जाणे येण्यासाठी धुळे व इतर ठिकाणी जाण्यासाठी बसेस उपलब्ध करून देणार आहे भाविकांची गर्दी वाढल्यास जादा बसची उपलब्ध करून देणार आहे . भाविकांसाठी सप्तशृंगी गडावरील धोंड्या कोंड्याची विहिरीजवळ स्वतंत्र बस स्थानक उभारण्यात येणार आहे .

१५ ऑक्टोबर पासून नवरात्र उत्सव सुरू



होत असुन सप्तशृंगी घाट रस्त्याची पाहणी केली असताना अनेक ठिकाणी कथड्यांची अवस्था खुपचं बिकट असुन सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरात लवकर दुरुस्त करण्याचे निर्देश दिले असुन युटर्न जवळ आरसा ( मिरर ) बसविल्याने वाहनधारकांना ये-जा करण्यासाठी सोपे होणार आहे .

**विशाल नरावडे प्रांताधिकारी कळवण**

आजच्या आढावा बैठकीत संबंधित



विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नेमुन दिलेल्या कामांची लवकर पुर्ण करावे तसेच पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी जलल शर्मा व जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक शहाजी उमप पुन्हा आढावा बैठक घेणार असुन तो पर्यंत नेमुन दिलेली कामं पुर्ण करावीत .

**- रोहिदास वारुळे तहसीलदार कळवण**

# कोल्हापूरच्या मातीत लोणंदच्या संदीप शेळकेंचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ता.खंडाळा येथील सामाजिक कार्यकर्ते संदिप शेळके पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल कोल्हापुरच्या मातीने घेतलेली असून त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे.कोल्हापूर जिल्ह्यातील कौलव ता.राधानगरी येथे शहिद जवान स्वप्निल चरापले फौंडेशनच्या यांच्या वतीने हा सन्मान देण्यात आला.शहिद स्वप्निल चरापले यांच्या ५ व्या स्मृतिदिनानिमित्त विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांचा सन्मान कार्यक्रम घेण्यात आला होता.याच वेळी लोणंदचे संदीप शेळके पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत सन्मान करण्यात आला. संदीप शेळके यांचा सन्मान करतेवेळी काँग्रेस समन्वयक सुशिल पाटील कौलवकर,माजी उपसभापती वीश पाटील कौलवकर,डॉ.जालंदर पाटील,सारथीचे विलासराव पाटील,कुंभारवाडीचे युवराज कुंभार, सरपंच रामचंद्र कुंभार, रणजितसिंह पाटील, केरबा पाटील,विश्वास पाटील, विजयसिंह पाटील,शेती अधिकारी सातप्पा चरापले,आण्णापा चौगुले,संभाजी कुंभार, सुहास जाधव,फौंडेशनचे किरण चरापले ओंकार पाटील, फौंडेशनचे कार्यकर्ते, विद्यार्थी,आणि ग्रामस्थ उपस्थित होते.या पुरस्काराबद्दल लोणंद नगरीतून त्यांचे विशेष अभिनंदन होत असून हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संदीप शेळके यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच हा पुरस्कार मिळाल्याने एक चांगली प्रेरणा मिळालेली असुन यापुढे ही समाज हित डोळ्यासमोर ठेवून काम करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे संदीप शेळके यांनी म्हटलेले आहे. सामाजिक आणि विविध क्षेत्रातील भरीव कामगिरी केली आहे.याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आपले सामाजिक आणि विविध क्षेत्रातील कार्य सर्वांनाच नवचैतन्य देणारे आहे. आपला प्रवास निर्भिड आहे. आमच्या फौंडेशनला प्रेरणादायी वाटतो. असेही म्हटलेले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फौंडेशनचे अध्यक्ष ओंकार पाटील, उपाध्यक्ष अभिजित पाटील, आनंदराव चरापले, दशरथ पाटील, विनायक पाटील, निखिल चौगुले, विजय पाटील व इतर कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली आहे.



# लाल कंधारी संशोधन केंद्र अंबाजोगाईला का हलवले ?

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन मोरे**

**कंधार :** लाल कंधारी जनावरे हे शेतीसाठी अत्यंत उपयुक्त व मौल्यवान असून कंधार तालुका हा लाल कंधारीचे उगमस्थान आहे. तालुक्यातील प्रत्येक गाव-वाडी तांड्यावर या जनावरांची संख्या लक्षणीय आहे, लाल कंधारी वळू व गाईचे नाव देशपातळीवर पोहोचले आहे,या लाल कंधारीचे संशोधन केंद्र गऊळ येथे स्थापना करण्यासाठी सातत्याने माजी खासदार डॉ.केशवराव धोंडगे व माजी आमदार गुरुनाथराव कुरुडे यांनी सतत सत्ताधारी नेत्यांच्या विरोधात आंदोलने सत्याग्रह करत कंधार तालुक्यातील गऊळ येथे लाल कंधारीचे संशोधन केंद्राची स्थापना करण्यात यश मिळवले,पण नांदेड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षपणा मुळे हे केंद्र अंबाजोगाईला हलवले असून हा मन्याड खोऱ्यातील जनतेवर मोठा अन्याच असून याविरुद्ध लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघातील जनता मोठे जन आंदोलन करत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात लढा उभारेल असा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार गुरुनाथराव कुरुडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात असे म्हटले आहे,की लाल कंधारी ही जनावरांची जात कंधार तालुक्यातीलच असल्याने त्यांना लाल कंधारी हे नाव देण्यात आलेले आहे, दिवंगत कंधारचे माजी आमदार. डॉ.केशवराव धोंडगे हे महाराष्ट्र विधानसभेवर पाच वेळा निवडून आले होते, त्यांनी लाल कंधारी जनावरांना जातीचा स्वातंत्र्य दर्जा का नाही ? तो मिळाला पाहिजे,ही मागणी विधानसभेत सतत मांडली परंतु हा प्रश्न केंद्र सरकारचा असल्याचे राज्य शासनाने सांगितले,असे उत्तर मिळाल्या नंतर इ.स १९७७ साली धोंडगे हे खासदार म्हणून निवडून आले,त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांचा हिताचा प्रश्न तळमळीने मांडला लाल कंधारी जनावरांची संख्या कंधार व परिसरातील दहा बारा तालुक्यातच ही जात असून ती मध्यम स्वरूपाची लाल रंगाची कणखर असून मराठवाड्याच्या शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असल्याने सर्वेक्षण करून या जातीला स्वातंत्र्य जातीचा दर्जा मिळावा म्हणून धोंडगे यांनी लोकसभेत सतत प्रश्न उपस्थित केला, या मागणीची केंद्राने दखल घेत या मागणीची सर्वे करून केंद्राला अहवाल पाठवा असे राज्य शासनास लेखी कळविले,राज्य शासनाने हे काम परभणी कृषी विद्यापीठाकडे सोपवले,या विद्यापीठाने सर्वे केला व



अहवाल केंद्राकडे पाठवला व केंद्रास सुचवले की ही जात " देवणी " ची उपजात नसून स्वातंत्र्य जात आहे,त्या आधारे केंद्राने नियमानुसार स्वातंत्र्य जात म्हणून लाल कंधारी या जातीला कायदेशीर मान्यता मिळाली, त्या काळात धोंडगे हे आमदार असल्याने लाल कंधारीच्या विकास व वाढीसाठी प्रयत्न केले,तालुक्यात केंद्र काढण्यासाठी प्रयत्न केले ज्या भागात कंधारी जनावरे जास्त व प्रसिद्ध असलेल्या गऊळ तालुका कंधार येथे लाल कंधारी जातीचे संशोधन केंद्र मंजूर करून आणले,

तेथे आवश्यक जागा देऊन शासनाने संशोधन केंद्राची निर्मिती केली,दवाखाना व इतर प्रकारच्या सोयी येथे सुरू होत्या परंतु धोंडगे यांच्या आजारी असल्याने आमच्या दोघांचेही तिकडे लक्ष नव्हते त्यामुळे महाराष्ट्र शासनाने निधी न पुरविल्याने दवाखाना व संशोधन केंद्र बंदच पडले,

आता तर धोंडगे यांचे निधन झाले,ही संधी साधून काही स्वार्थी नेत्यांनी हे केंद्र रद्द केल्याचे व ते आंबेजोगाईला नेल्याचे कळले तिकडेही ही जनावरे नाहीत, हे केंद्र आंबेजोगाई ला गेल्यामुळे कंधार तालुक्यातील सर्वसामान्य जनतेत संतापाची लाट उसळली आहे,ज्या कंधार वरून लाल कंधारी हे नाव पडले,त्या गऊळ भोवतालच्या ५० ते ६० गावातील सर्व जनावरे लाल कंधारची असल्याने इथले केंद्र का उठवले? जिकडे एकही पूजेला लाल कंधारीचे जनावरे मिळणार नाहीत,अशा भागात का हलवले,त्यास नांदेड जिल्ह्यातील खासदार आमदारांनी ते का जाऊ दिले?असा सवाल सर्व सामान्य जनता विचारत आहे,नांदेड जिल्ह्यातील खासदार व आमदारांनी या अन्यायविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे नाही का गरीब शेतकऱ्याला परवडणारी व जास्तीची दूध देणारी ही जात आंबेजोगाईला का नेली? तेथे लाल कंधारी चे एकही जनावर पाहायला मिळणार नाही,असा सवाल माजी आमदार कुरुडे यांनी उपस्थित केला आहे.

# महाविकास आघाडीच्या 18 पैकी 18 उमेदवार विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** कृषी उत्पन्न बाजार समिती 2023 निवडणूक यात दि.7 ऑक्टोबर रोजी मतदान सर्वत्र शांत वातावरणात पार पडला व आज दिनांक 8 ऑक्टोबर रोजी निकाल जाहीर करण्यात आला आहे. भाजपा, महाविकास आघाडी यांच्यात अटीतटीचा निवडणूक झाली. यात 18 पैकी 18 महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले आहेत. बहुचर्चित असलेल्या उमरी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे निकाल आज तहसील कार्यालयात मतमोजणी झाली असून शेवटच्या क्षणी महाविकास आघाडीचे पंधरा पैकी पंधरा उमेदवार निवडून आले असल्याचे घोषणा निवडणूक निर्वाचन अधिकारी तथा तहसिलदार हरिश गाडे यांनी जाहीर केले आहे या निवडणुकीत विजयी झाले ल्या उमेदवारांची यादी खालील प्रमाणे आहे 1) शिरीष भाऊ देशमुख गोरठेकर 2) पवळे अब्बाजी माधवराव 3)हस्सेकर देवराव मारोती 4) कदम बापूराव तुळशीराम 5) गाडे गणेश





भिवसेनराव6) जाधव गणपतराव आत्माराम 7) ढगे प्रल्हादराव बाबाराव हे सेवा सहकारी सोसायटी सर्व साधारण जागेवर विजयी झाले आहेत. महीला राखीव असलेल्या सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघात1) डांगे वर्षां सचिन 2).वहींदे शिवकांताबाई अच्युत हे विजयी झाले आहेत सेवा सहकारी सोसायटी मागासवर्गीय प्रवर्गातील केसगिरे व्यंकटराव उत्तमराव विजय झाले आहे सेवा सहकारी सोसायटी विमुक्त भटक्या जमाती मतदारसंघातील राठोड शेषेराव फकिरा हे विजयी झाले.चौकटीत घ्यावेत सर धन्यवाद  ग्रामपंचयत सर्व साधारण मतदारसंघ 1) हिवराळे माधवराव नागोराव तर2) कवळे प्रकाश आनंदराव हे विजय संपादन केला आहे.आर्थिक दुर्बल घटकातील जाधव ज्ञानेश्वर नामदेव व अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातील पांडेवाड साईनाथ गणपती हे विजयी झाले आहेत.ही निवडणूक चुरशीची लढत होणार असे भाकीत होते.पंरतु मतदारांनी कै.बापुसाहेब गोरठेकर यांच्या प्रति आपले प्रेम आहे या माध्यमातून पुन्हा एकदा त्यांचें चिरंजीव शिरीष भाऊ गोरठेकर व कैलास भाऊ गोरठेकर यांच्या कडेच निर्विवाद बहुमत देऊन गोरठेकर यांच्या वर असलेला जिव्हाळा दाखवुन दिले आहे.

या निवडणुकीत भाजपाने चांगलेच आव्हान निर्माण केले होते अमोल ढगे व सुधाकरराव देशमुख यांनी शिस्त बद्ध प्रचार व कुशल नियोजन लावत खुप मोठ्या प्रमाणात संघर्ष केला असून शेवटच्या टप्प्यात मात्र मतदारांनी फक्त गोरठेकर यांच्याकडेच कृषी उत्पन्न बाजार समिती राहिले पाहिजे अशि भावना व्यक्त करत त्यांनां विजय निश्चित करुन दिला.या निवडणूक दरम्यान नायगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार वसंतराव चव्हाण, एडवोकेट भाऊसाहेब देशमुख गोरठेकर, सुभाषराव देशमुख नाना,शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे सर, प्रा.रविंद्र पाटील चव्हाण,लिंगराम पाटील कवळे, मा.नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, बापूसाहेब कौडगावकर यांच्यासह तालुक्यातील महाविकास आघाडीचे कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली आहे.

# असुविधांविरोधात जळगावात शरद पवार गटाचे भजन आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** शहरातील खड्डेमय व धूलिमय रस्ते, साफसफाईचा अभाव, दिवाबत्ती, तुंबलेल्या गटार यांसह विविध नागरी सोयी-सुविधांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातर्फे सोमवारी दुपारी महापालिका प्रशासन, आमदारांच्या विरोधात भजने गात आंदोलन करण्यात आले. आंदोलन शहरातील छत्रपती शिवाजी महाराजनगरमधील रेल्वे उड्डाणपुलाजवळ करण्यात आले. यावेळी आमदार सुरेश ऊर्फ राजूमामा भोळे यांनी आंदोलकांची भेट घेतली. त्यावेळी आंदोलकांनी त्यांच्या मोटारीला घेराव घालून नागरी सोयी-सुविधांबाबत प्रश्नांचा भडिमार केला. आमदार भोळे यांनी, संबंधित कामांच्या निविदाप्रक्रिया सुरू असून, कामे लवकरच मार्गी लागतील. यासंदर्भात आयुक्तांसमवेत बैठक घेणार असल्याची ग्वाही दिली. जिल्हाध्यक्ष अॅड. रवींद्र पाटील, महानगराध्यक्ष लाडवंजारी, युवक महानगराध्यक्ष रिकू चौधरी, शहर संघटक राजूभाऊ मोरे, महानगर जिल्हा उपाध्यक्ष भगवान सोनवणे, अकिल पटेल, मंगला पाटील, मजहर पठाण यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.

# लाल बावटा शेतमजूर युनियनच्या राज्य अधिवेशनाचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य लालबावटा शेतमजूर युनियनच्या दोन दिवसीय राज्य अधिवेशनाचा आज उत्साहात समारोप करण्यात आला. समारोपाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव मंडळ सदस्य कॉ. डॉ. भालचंद्र कानगो व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय कौन्सिलचे सदस्य अमरावतीचे कॉ. तुकाराम भस्मे यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतमजुरांच्या आणि ग्रामीण कष्टकऱ्यांच्या प्रश्नाकडे सतत दुर्लक्ष करणाऱ्या व रोजगार हमीची योजना बासनात गुंडाळणाऱ्या, गायरान व वन जमिनीत अतिक्रमण करून उदरनिर्वाह करणाऱ्या भूमिहीनांना जमिनीतून हुसकावून लावण्याचे षडयंत्र शेतमजूर संघटनेने उधळून लावला पाहिजे असे आवाहन कॉ. कानगो यांनी यावेळी केले.याविरोधात विरोधात शेतमजुरांनी व तमाम ग्रामीण कष्टकऱ्यांनी लाल बावटा शेतमजूर युनियनच्या नेतृत्वाखाली संघटित होऊन लढा उभा करावा, असे आवाहनही कआनगओनई केले. ग्रामीण कष्टकऱ्यांचे व सर्वसामान्य जनतेचे जगणे कठीण करणाऱ्या संघ भाजप सरकारच्या जनविरोधी धोरणांचा निषेध करण्याचे व जाती धर्माच्या नावाने राजकारण करणाऱ्या सरकारला ग्रामीण कष्टकऱ्यांनी सत्तेतून खाली खेचावे असे आवाहन कॉ. तुकाराम भस्मे यांनी यावेळी केले.

समारोपपूर्वी राज्य सरचिटणीस कॉ. शिवकुमार गणवीर यांनी काल मांडलेल्या संघटनात्मक व राजकीय अहवालावरील चर्चेचा समारोप केला. चर्चेला उत्तर देताना कॉ. शिवकुमार गणवीर यांनी अहवालात सुचवलेल्या दुरुस्त्या व अहवालात घातलेली भर मान्य केली.
तीन वर्षासाठी 9 पदाधिकाऱ्यांसह 41 जणांची राज्य कमिटी निवडण्यात आलेली असून महाराष्ट्रातील 27 जिल्ह्यांचे प्रतिनिधी या राज्य कमिटीवर निवडण्यात आलेले आहेत. या 41 जनामधूनच नऊ पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली असून बीडचे कॉ. नामदेव चव्हाण यांची राज्य अध्यक्षपदी तर भंडाराचे कॉ. शिवकुमार गणवीर यांची राज्य सरचिटणीसपदी फेर निवड करण्यात आली आहे. राज्याचे कार्याध्यक्ष म्हणून औरंगाबादचे कॉ.कॉ.राम बाहेती यांची एक मताने निवड कर करण्यात आली. या तीन प्रमुख पदाधिकाऱ्यांसह तीन उपाध्यक्ष आणि तीन सहसचिव यांचीही निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षा मध्ये गोंदियाचे हौसलाल रहांगडाले, नंदुरबारचे ईश्वर पाटील व अमरावतीचे संजय मंडवधरे यांची निवड करण्यात आली आहे तसेच तीन सह सचिवांमध्ये गोंदियाच्या कल्पना डोंगरे, औरंगाबादचे कॉ.गणेश कसबे,सांगलीचे कॉ. विजय बचाटे यांचा समावेश करण्यात आला आहे. 41 जणांच्या राज्य कमिटी सदस्यांपैकी दोन जागा रिक्त ठेवण्यात आल्या असून कोषाध्यक्षचे पदही उर्वरित भौगोलिक विभागासाठी रिक्त ठेवण्यात आले आहे. राज्यभरातून आलेल्या अडीचशे पेक्षा जास्त प्रतिनिधींनी यावेळी औरंगाबाद के कॉम्रेडस् को लाल सलाम अशा घोषणांनी अधिवेशन सभागृह दणाणून सोडला. या अधिवेशनसाठी कॉ.गणेश कसबे, गणेश सुसे, मारीशा पवार, रुखमण श्रीखंडे, अण्णा चव्हाण, अश्फाक सलामी,अभय टाकसाळ आदीनी परिश्रम घेतले.

# कुंडलवाडी बाजार समितीवर महाविकास आघाडीचा झेंडा

## 18 पैकी 17 जागेवर दणदणीत विजय : भास्करराव पाटील खतगावकर यांची यशस्वी खेळी

आधुनिक केसरी न्यूज

**कुंडलवाडी :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत महाविकास आघाडी प्रणित संगमेश्वर शेतकरी विकास पॅनल ने 18 पैकी 17 जागेवर दणदणीत विजय मिळवित भाजपा प्रणित कुंडलेश्वर शेतकरी विकास पॅनलचा दारुण पराभव करून बाजार समितीवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकवला आहे.. कुंडलवाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या 18 जागेसाठी मतदान प्रक्रिया दिनांक सात रोजी पार पडून दिनांक आठ रोजी नगरपालिका सभागृह येथे मतमोजणी पार पडली आहे. महाविकास आघाडी प्रणित संगमेश्वर शेतकरी पॅनल ने 18 पैकी 17 जागेवर विजय मिळविला आहे तर भाजपच्या कुंडलेश्वर शेतकरी विकास पॅनलला फक्त एका जागेवर समाधान मानावे लागले आहे.यामधील मतदारसंघ



निहाय विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे : विविध सेवा सहकारी सोसायटी सर्वसाधारण मतदारसंघ ऐबडवार सुनील 122 मते, कदम अशोक 107, चंदनकर संतोष 117, भाले बाबाराव 130, यरकलवाड राजेंद्र 108, लखमपुरे हनमंत 130, शिंदे आनंदराव 124, सेवा सहकारी संस्था महिला राखीव मतदार संघ ढगे देवणबाई 124, सेवा सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती मतदार संघ मेहेत्रे कोंडीबा 127, सेवा सहकारी इतर मागास मतदारसंघ मोहमद खय्युम 116, ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदार संघ नरवाडे माधव 99, शिंदे साहेबराव 99, ग्रामपंचायत आर्थिक दृष्ट्या मागास मतदारसंघ साईनाथ निवळे 120, ग्रामपंचायत अनुजाती जमाती मतदार संघ पतंगे सिद्धार्थ 131, हमाल मापाडी मतदारसंघ वारेवार शंकर 81,असे उमेदवार विजयी झाले आहेत तर व्यापारी मतदारसंघात महाविकास आघाडीकडून राजेश्वर उत्तरवार,रमेश दाचावार,हे बिनविरोध निवडून आले आहेत. 18 जागेपैकी 17 जागेवर महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाल्यामुळे माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांचे पुन्हा एकदा कुंडलवाडी बाजार समितीवर वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर जी कोरवार,सहायक निवडणूक निर्णय अधिकारी बी पी तलारवार, सचिव लक्ष्मीकांत येपुरवार,यांनी काम पाहिले आहे.मतमोजणी केंद्राबाहेर सहायक पोलिस निरीक्षक विश्वजित कासले, पोलीस उपनिरीक्षक नारायण शिंदे यांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे.

# चाळीसगावात अफू बोंडासह चुरा मिळून २८ लाखांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** चाळीसगाव येथील रेल्वेस्थानकाजवळील मालधक्का भागात मोटारीतून नऊ गोण्यांमधील सुमारे १८ लाख २ हजार ४०० रुपये किमतीची अफूची बोंडे व बोंडाचा चुरा, तसेच १० लाखांची मोटार मिळून सुमारे २८ लाख २ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चालकाविरुद्ध चाळीसगाव येथील शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चाळीसगाव येथे शहर पोलीस ठाण्यातर्फे काही दिवसांपासून नशामुक्त चाळीसगाव शहर अभियान राबविण्यात येत आहे. त्यात प्रथम चाळीसगाव पालिकेच्या मदतीने अवैध दारू विक्रेत्यांची ठिकाणे नष्ट करण्यात आली.



# १९७७ च्या बॅचचा सहावा स्नेहमिलन सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** एज्युकेशन सोसायटीच्या गोकुळनगर नांदेड येथील पीपल्स ायस्कूल मध्ये शिकलेल्या दहावी १९७७ च्या दहावी च्या बॅच चा सहावा स्नेहमिलन सोहळा संपन्न झाला.
डॉ. दीपक मांडाखळीकर, डॉ. दीपक गोरे, डॉ. सुरेश पवार, इंजिनिअरिंग क्षेत्रातील प्रमोद डुब्बेवार, अनिल महामुनि, सुधीर बोंडेकर, श्रीकांत मांगुळकर, अनिल शर्मा, अविनाश देसाई, बँकिंग क्षेत्रातील सुनील शिंदे, निशा कापसे, संभा कुबडे, व्यावसायिक मुन्ना बजाज, राजेंद्र मालपाणी, व्यंकटेश कवटेकर, मुकुंद जाधव, राजू बच्चेवार, पोलीस क्षेत्रातील प्रवीण गायकवाड, सुधीर जोशी, फोटोग्राफी क्षेत्रातील आनंद बेटगिरी, टेलरिंग क्षेत्रातील शशिकांत गोहेल, आमदारांच्या पत्नी सो. आशा शिंदे (चिखलीकर), शिक्षण क्षेत्रातील सौ. स्मिता बोकील, शिरीष दडके, प्रशांत खरवडकर, विजय वाघ, जयंत देऊळकर, माजी जिल्हा क्रीडा अधिकारी गंगलाल यादव, सामाजिक कार्यकर्ता सुनील शर्मा, शासकीय क्षेत्रातील श्रीकांत अकोलकर, अविनाश जोशी, दुर्गादास कुलकर्णी, अमोल कुलकर्णी, अशी व इतर एकूण १८८ मान्यवर पीपल्स हायस्कूल या शाळेत १९७७ साली शिकली.
पुण्यापासून ३५ किलोमीटर अंतरावर असलेल्या रिपल्स रिसॉर्ट मध्ये शनिवार दिनांक ७ ऑक्टोबर २३ व रविवार दिनांक ८ ऑक्टोबर २३ असा दोन दिवस विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा संपन्न झाला. मनसोक्त गप्पा, जुन्या आठवणी, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, खडकवासला धरणाला भेट, बोटिंग, नृत्य वगैरे कार्यक्रम करण्यात आले. याप्रसंगी अमोल कुलकर्णी, माधुरी कुलकर्णी, आनंद बेट्टगिरी, दीपक मांडाखळीकर, श्रीकांत अकोलकर, अनिल अमृतवार, राजू बच्चेवार, गंगाधर शिंदे, मंदाकिनी शिंदे, शालिनी पांडे, स्मिता बनगिनवार, मुन्ना बजाज, राजेंद्र मालपाणी, शिरीष दडके, श्रुती दडके, जी पी शहाणे, शिवाजी बर्वे, संजय बोकील, अशोक सौंदरकर, अनिल पटवर्धन, व्यंकटेश कवटेकर, अनिल महामुनि, अरुणा महामुनि, स्वाती पटवर्धन, स्मिता बोकील, प्राजक्ता बर्वे, अश्विनी जोशी, शोभा शहाणे, प्रबोधिनी डिग्गीकर, निशा सौंदरकर, अविनाश जोशी, संभा कुबडे, सुधीर बोंडेकर, संजीवनी कापशीकर, श्रीकांत मांगुळकर, सुनील शिंदे, प्रशांत खरवडकर, सुनीता मांगुळकर, प्रमोद डुब्बेवार, विजय वाघ, ज्योत्स्ना डुब्बेवार, जयंत देवळकर, अनिल शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते. असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

# भाद्रपदातील कुत्र्यांची शाळा भरली रे

आधुनिक केसरी न्यूज

**लखमापूर :** ग्रामीण भागात सध्या रस्त्यावर व जागोजागी मोकाट कुत्रे मोठ्या प्रमाणावर दहशत करत असल्याने प्रवासी, वाहनधारकांना एकप्रकारे डोके दुःखी वाढली आहे. त्यामुळे या मोकाट कुत्र्यांचे करायचे काय ? असा प्रश्न ग्रामीण भागातील नागरिकांसमोर आवासुन उभा राहिला आहे. सध्या भाद्रपद महिनांचा पर्वकाळ सुरू असुन निसर्गाच्या नियमांने कुत्रे एकत्र येतात. परंतु सध्या तर ग्रामीण भागातील वेगवेगळ्या ठिकाणी, चौकात, गावातील मुख्य रस्त्यावर ,शाळेच्या आवारात, बस थांबा इ.जागेवर कमीत कमी वीस ते तीस कुत्र्यांची मोठी टोळी आपली दहशत निर्माण करीत असल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक ठिकाणच्या नागरिकांनी या मोकाट कुत्र्यांचा धसका घेतला आहे. ग्रामीण भागात मोक्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मोकाट कुत्र्यांचा भला मोठा थवा आजही येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकांच्या मनाला भीतीचे वातावरण निर्माण करीत आहे. तर ब-याच ठिकाणी अशा मोकाट कुत्र्यांनी अनेकांना चावा घेतल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे. हे सर्व मोकाट कुत्रे अगदी सकाळी सकाळी गावातील प्रमुख रस्त्यावर आपले ठाण मांडुन बसत असल्याने सकाळी शाळेतील जाणारे लहान लहान विद्यार्थी, विविध कंपन्यामध्ये जाणारे कामगार, सायकल स्वार,मोटारसायकल इ.च्या पाठीमागे ही मोकाट कुत्रे धावतात त्यामुळे लहान मोठ्या अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.त्यामुळे अनेक नागरिकांना आर्थिक झळ मोठ्या प्रमाणावर खावी लागत आहे. शासकीय आदेशानुसार



ज्या कुत्र्यांचा गाळांत पट्टा आहे. त्यांना मालकीचे कुत्रे समजले जात होते. त्यामुळे अशा कुत्र्यांना कोणी धरत नव्हते. परंतु ग्रामीण भागात आजही जवळजवळ ९०टक्के कुत्र्यांच्या गळ्यात पट्टा दिसत नाही. त्यामुळे अशा अनेक मोकाट कुत्र्यांचा मालक कोण ? हा प्रश्न सोडविताना एकप्रकारे डोके दुःखी बनली आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी बिबट्यांची दहशत मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे मध्यांतरीच्या काळात वाड्या, वस्तीवरील कुत्र्यांवर बिबट्यांने हल्ला करून अनेक कुत्र्यांचा नाश केला होता. जर बिबट्यांने अनेक कुत्र्यांचा नाश केला तर सध्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात मोकाट कुत्रे आली कोठून असे नागरिकांमधून बोलले जात आहे. रात्रीच्या वेळी मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ मोठ्या प्रमाणावर होत असून कामांवरून आलेल्या कामगारांना आराम करताना मोठ्या प्रमाणावर त्रास होतो. तर सकाळी विद्यार्थी शाळेत जातांना मोकाट कुत्र्यांनी आपल्या वर हल्ला करू नये म्हणून थेट पालकांना आपल्या बरोबर घेऊन जावे लागत आहे. तेव्हा या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त कोण करणार असा संताप जनक सवाल ग्रामीण भागातील विविध ठिकाणच्या जनतेमधुन निघत आहे. शहरी भागात जर मोकाट कुत्रे आढळले तर येथील पालिका कामगार ताबडतोब अशा मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करतात. तर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर मोकाट कुत्रे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर दिसतात . तेव्हा तेथील स्थानिक ग्रामपंचायतीची नेमकी भुमिका काय ? हा प्रश्न नेहमी ऐरणीवर राहिला आहे. यासाठी ग्रामपंचायतीची भुमिका काय ?असेही विविध ठिकाणच्या भागातील नागरिकांनी सवाल केला आहे. जर लहान बालक या मोकाट कुत्र्यांच्या तावडीत सापडले तर काय गत होईल ! यांची कल्पना करणेही मुश्कील होऊन बसेल. असे सध्या संताप जनक सुर नागरिकांमधून निघत आहे.यासाठी उपाययोजना म्हणून मोकाट कुत्रे बंदिस्त करून त्यांना अन्य ठिकाणी सोडले जावे जाणेकरून भविष्यात होणारे कुत्र्यांच्या हल्ल्यापासून नागरिकांना मोकळा श्वास घेता येईल. तेव्हा स्थानिक ग्रामपंचायतीने अशा मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरत आहे.

# उसाला ५ हजार दर द्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** आगामी ऊस हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति टन पाच हजार रुपये दर द्यावा अन्यथा दोन साखर कारखान्यांतील अंतराची अट काढून टाकण्यात यावी, अशी मागणी करणारा ठराव शनिवारी शेतकरी



संघटनेच्या ऊस परिषदेमध्ये संमत करण्यात आला. शेतकरी नेते रघुनाथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेची ऊस परिषद येथील राजर्षी शाहू स्मारक सभागृहात आज झाली. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील शेतकरी या परिषदेला उपस्थित होते. परिषदेपूर्वी पारंपारिक वाद्यांच्या गजरात रघुनाथ पाटील व पदाधिकाऱ्यांची मिरवणूक काढण्यात आली. त्यांचे जिल्हा अध्यक्ष वकिल माणिक शिंदे यांनी स्वागत केले. ऊस उत्पादकांसाठी किमान वैधानिक किंमत ऐवजी रास्त व फिफायतशीर दर (एफआरपी) लागू करण्यात आला. मात्र एफआरपीचा कायदा हा कालबाह्य ठरला आहे. एफआरपीप्रमाणे तीन हजार रुपयांच्या आसपास प्रति टन दर मिळत असून ऊस उत्पादनाचा वाढता खर्च पाहता तो अत्यंत अपुरा आहे. यामुळे ऊसाला प्रति टन पाच हजार रुपये भाव मिळाला पाहिजे. अन्यथा साखर कारखान्यांमधील अंतराची अट काढून टाकल्यास खुली स्पर्धा वाढीस लागेल. या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास सन २०१७ प्रमाणे साखर वाहतूक, शेतमाल रोखणारे आंदोलन हाती घेतले जाणार आहे, असा इशारा पाटील यांनी दिला. ऊसाबाबत काही शेतकरी संघटनांनी एफआरपी पेक्षा प्रति टन ४०० वा ५०० रुपये अधीक, ऊस ट्रकमध्ये उतारा नमुना तपासणी, वजन काटा तपासणी अशा काही मागण्या लावून धरल्या आहेत. त्यामुळे फारसे काही साध्य होणार नाही. राजकीय सोय म्हणून हे आंदोलन सुरू आहे, अशी टीकाही पाटील यांनी यावेळी केली.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# वैजापुरात जिवाजी महाले यांच्या ३८८व्या जयंती निमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील नाभिक समाज व समस्त वैजापूर वासीयांच्या वतीने सोमवार (ता.०९)रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात शिवाजी राजांचे एकनिष्ठ रत्न जीवाजी महाले यांच्या ३८८व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यकम संपन्न झाला. आरंभी आ. रमेश पा. बोरनारे यांचे बंधू संजय बोरनारे, ऍड प्रवीण साखरे, रणजित चव्हाण, शिवसेना शहर प्रमुख प्रकाश चव्हाण, धोंडीरामसिंह राजपूत, दशरथ बनकर, स्वप्नील जेजुरकर, राजेश गायकवाड, रघुनाथ जाधव, गणेश अनर्थे, अमित अनर्थे, श्री विश्वासू, बाबासाहेब गायकवाड, अशोक पवार आप्पा, प्रमोद पठारे, मोती भाऊ वाघ, अशोक बागुल, अनुपमा दत्तात्रय मढे, दत्तात्रय मढे, मथुरिया, अण्णासाहेब ठेंगडे, सुधाकर आहेर, शिवाजी अनर्थे, संतोष गायके, रमेश तोडकर, सुरेश जाधव, विलास वैद्य, सतीश अनर्थे, गणेश अनर्थे भायगावकर यांनी जिवाजी महाले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आयोजक दिलीप अनर्थे यांनी आभार, सूत्र संचलन व जिवाजी यांच्या कार्यपटावर डी,डी ठाकूर यांनी प्रकाश टाकला, नाशिक जिल्हा भाजपा महिला सरचिटणीसपदी अनुपमा मढे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला, महाराष्ट्र नारायणी सेनेच्या वतीने अशोक पवार यांनीही अनुपमा यांचा सत्कार केला.

# दाजीने दाखवले भाऊजींना मार्केट कमिटी निवडणुकीत आसमान

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** संपुर्ण जिल्हयाचे लक्ष लागुन राहिलेल्या बहुचर्चित लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत महाविकास आघाडीने महाविजय संपादन करीत महायुतीचा धुव्वा उडाला आहे.

लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या १८ जागेसाठी दि. ७ ऑक्टोबर रोजी मतदान झाले व दि. ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी झाली यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शेकापचे आ. शामसुंदर शिंदे, काँग्रेसचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार रोहिदास चव्हाण, बीआरएसचे माजी आ. शंकर अण्णा धोंडगे, मन्याड फांऊडेशनचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ दादा पवार, शिवा संघटनेचे अध्यक्ष मनोहर धोंडे, शेतकरी नेते साहेबराव पाटील काळे यांच्या नेतृत्वाखाली महाविकासव आघाडी प्रणित शेतकरी विकास पॅनलने १८ पैकी १६ जागेवर दणदणीत संपादन करीत महाविजय मिळवित भाजपचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपा - शिवसेना (शिंदे) गटाचा धुव्वा उडविला असुन केवळ २ जागेवर त्यांचे उमेदवार विजयी झाले आहेत. यात महाविकास आघाडी प्रणित शेतकरी विकास पॅनलचे विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे - सेवा सोसायटी सर्वसाधारण संघ विक्रांत शिंदे (५६८ मते), चंद्रसेन पाटील (५१७ मते), स्वप्नील उमरेकर (५५० मते), भास्कर ढगे (५२० मते), दता ढगे (५६० मते), साहेबराव पाटील काळे (५६० मते), धोंडीबा पवार (४९१ मते), सेवा सहकारी संस्था महिला राखीव मतदारसंघ -पुनम क्षीरसागर (५२५ मते), सयंत्राबाई सर्जे (५४३ मते) सेवा सहकारी संस्था (विमुक्त जाती/ भटक्या जमाती) मतदार संघ - केशव तिडके (५६० मते), ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदार संघ - अण्णासाहेब पवार (५४३ मते), लक्ष्मीबाई वाकडे (५१४ मते), हमाल-मापाडी संघ - भाऊराव कंधारे (२०३ मते) सदरील उमेदवार हे महाविकास आघाडी प्रणित शेतकरी विकास पॅनलचे विजयी



झाले आहेत. तर भाजपचे खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली बळीराजा परिवर्तन पॅनलचे व्यापारी मतदार संघाचे पुढील २ उमेदवार - केशव चव्हाण (११६मते), किरण वटमवार (१०८ मते) हे दोन उमेदवार विजयी झाले आहेत. सदरील निवडणूक प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून माधव चौधरी, बोधगिरे,सचिव ए.बी. घोरबांड आदीने परीश्रम घेतले. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी व कार्यकत्यांनी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत महाविकास आघाडीने महाविजय संपादन केल्यामुळे गुलाल उधळत फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला तर शेकापचे आ. शामसुंदर शिंदे, शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा सौ आशाताई शामसुंदर शिंदे, काँग्रेसचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे, काँग्रेसचे माजी आमदार अमर राजूरकर , शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार रोहिदास चव्हाण शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे सर, मन्याड फांऊडेशनचे एकनाथ दादा पवार ,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पा., पवार , माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीनिवास मोरे आदीच्या प्रमुख उपस्थितीत रॅली काढून मोढा यार्डात विजयी सभा घेण्यात आली.चौकट शिवसेना नेते माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रचारात भाग घेतला असता तर लोहा मार्केट कमिटीच्या निकालाची पुनरावृत्ती झाली असती असे सर्वसामान्य मतदारांतून बोलले जात आहे.

## साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे मैदानी स्पर्धेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे दिनांक 5 ऑक्टोबर 2023 रोजी खुलताबाद येथे झालेल्या तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये साई पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजने चमकदार कामगिरी करत तालुक्यात शाळेचे वर्चस्व कायम राखले . या स्पर्धेत 100 मीटर धावणे गायत्री निकम द्वितीय क्रमांक, सविता गायकवाड 200 मिटर धावणे प्रथम क्रमांक, 400 मीटर धावणे संस्कृती वेताळ तृतीय क्रमांक.600 मिटर धावणे तन्वी साबळे द्वितीय क्रमांक, श्रीकांत गायकवाड तृतीय क्रमांक, 800 मिटर धावणे साक्षी काळे द्वितीय क्रमांक 1500 मिटर धावणे करण घुसिंगे प्रथम क्रमांक, अनुष्का तांदळे द्वितीय क्रमांक,राणी आहेवाड तृतीय क्रमांक.3000 मिटर धावणे ओम गायकवाड प्रथम क्रमांक, सविता गायकवाड द्वितीय क्रमांक 5 किलोमीटर चालणे रुद्र बोर्डे 17 वयोगटात प्रथम क्रमांक, अतुल राठोड तृतीय क्रमांक,19 वयोगटात करण घुसिंगे प्रथम क्रमांक, रवि नलावडे द्वितीय क्रमांक, गायत्री तांदळे तृतीय क्रमांक, लांब उडी अतुल काळे तृतीय क्रमांक, अभिषेक साळुंखे तृतीय क्रमांक, थाळीफेक स्पर्धेत अदिती नलावडे प्रथम क्रमांक, बाबासाहेब नलावडे प्रथम क्रमांक, रोहित नलावडे द्वितीय क्रमांक गोळा फेक स्पर्धेत




माया काकडे प्रथम क्रमांक, अदिती नलावडे द्वितीय क्रमांक, सलमान पठाण द्वितीय क्रमांक, भालाफेक स्पर्धेत ऋषिकेश राऊत तृतीय क्रमांक 80 मिटर हर्डल्स अनुष्का तांदळे प्रथम क्रमांक, तेजस्विनी नलावडे द्वितीय क्रमांक श्रीकांत गायकवाड तृतीय क्रमांक 100 मिटर हर्डल्स 17 वयोगटात कावेरी गायकवाड प्रथम क्रमांक,राणी आहेवाड द्वितीय क्रमांक,19 वयोगटात संकृती वेताळ प्रथम क्रमांक साक्षी काळे द्वितीय क्रमांक 110 मिटर हर्डल्स अभिषेक गायकवाड प्रथम, आकाश आहेवाड तृतीय क्रमांक दिपक जाधव तृतीय क्रमांक 400 मिटर हर्डल्स समृद्धी गायकवाड प्रथम क्रमांक, माही साबळे द्वितीय क्रमांक, अभिजीत गायकवाड प्रथम क्रमांक, अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले 27 विद्यार्थ्यांची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.प्रथमच एका शाळेतील 27 विद्यार्थ्यांची जिल्हास्तरिय स्पर्धेत निवड होणारी पहिली शाळा ठरली आहे.या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्था अध्यक्ष किशोर पाटील नलावडे तसेच बंडू शिंदे, सोमिनाथ आबा तुरेवाले, प्राचार्य गोपाल अधाने, उपप्राचार्य गिरधर जाधव, प्राध्यापक अतुल जाधव, रामेश्वर मते, ज्ञानेश्वर अधाने, ज्ञानेश्वर नलावडे, संदीप चव्हाण, अक्षय गोसावी, सौरभ दहातोंडे, प्राध्यापिका ज्योती वायसळ, शितल नलावडे, साक्षी जैस्वाल, वर्षा लोंढे, कालिंदा जंजाळ, रिना जैस्वाल, रेणुका देवकर, जयश्री भांगरे, कल्पना नलावडे, राज्यश्री राणे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## धुळ्याजवळ गुटख्याची वाहनातून वाहतूक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिल्लीहून मुंबईकडे बेकायदेशीरपणे होणारी गुटख्याची वाहतूक धुळे पोलिसांनी रोखली असून कंटेनरसह ४८ लाख ४३ हजार ४४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी चालकास अटक करण्यात



आली असून त्याच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

मुंबई-आग्रा महामार्गावर धुळ्याजवळील सोनगीर टोल नाक्याजवळ ही कारवाई झाली. याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी अनिल पगार यांनी तक्रार दिली. तंबाखुजन्य पदार्थांना महाराष्ट्रात प्रतिबंध असताना दिल्लीहून मुंबईकडे गुटख्याची वाहतूक होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. या अनुषंगाने सोनगीर टोल नाक्याजवळ पथक तैनात करण्यात आले होते.

संशयित कंटेनर येताच पोलिसांच्या मदतीने तो अडविण्यात आला. तपासणी करण्यात आली असता प्रतिबंधित पानमसाला, गुटखा सदृश्य माल आढळला. दिल्लीहून मुंबईकडे हा माल नेण्यात येत असल्याची कबुली चालकाने दिली. पोलिसांनी या प्रकरणी चालक दिलीपकुमार दुबे (रा. कुसवडा, उत्तरप्रदेश) यास अटक केली. रिंकूसिंग (रा. दिल्ली), सिकंदर (रा. मुंबई), राजेश आणि कंटेनर मालकाविरूद्ध सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## देवगिरी कारखाना सुरू करा; सहकारमंत्र्यांना घातले साकडे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील देवगिरी सहकारी साखर कारखाना पुनरुज्जीवित करा, अशी मागणी जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांची शुक्रवारी भेट घेऊन केली.

फुलंगी व छत्रपती संभाजीनगर था दोन तालुक्यांतील एकेकाळी वैभव असणाऱ्या देवगिरी सहकारी साखर कारखाना मागील १३ वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. देवगिरीवर कर्ज असल्याने तो एमएससी बँकेच्या ताब्यात आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ६ ऑक्टोंबरला छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांची भेट घेऊन त्यांना कारखान्याची हकिकत सांगितली व कारखाना कसा सुरू होईल, याचा विचार करण्याची मागणी केली. त्यांनी सर्व परिस्थिती समजून घेतल्यानंतर लवकरच मुंबई येथे कारखान्यासंदर्भात असलेल्या सर्व विभागाच्या अधिकाऱ्याची बैठक बोलावून तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी आमदार विक्रम काळे, जिल्हाध्यक्ष राहुल डाकले, जिल्हा उपाध्यक्ष कैलास पाटील, तालुका अध्यक्ष बाळासाहेब तांदळे,फुलंब्री तालुका कार्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



